सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, २४ फेब्रुवारी २०२५ वर्ष दुसरे अंक ३३० पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

adani
Foundation

## अदाणी फाउंडेशन वचन देत आहे मुंबई आणि अहमदाबाद येथे एकात्मिक 'आरोग्य मंदिरे' उभारण्याचे.



**आमच्या मंदिरांमध्ये आरोग्य, सेवा ह्यांना नेहमीच अग्रक्रम दिला जाईल.**

अदाणींमध्ये, आमचा असा विश्वास आहे की आरोग्य हा विशेषाधिकार नाही, तर हक्क आहे. कारण कुणाची पार्श्वभूमी किंवा आर्थिक परिस्थिती काहीही असो, जागतिक दर्जाची वैद्यकीय सेवा प्रत्येकाला मिळायलाच हवी. तसेच वैद्यकीय शास्त्रा मध्ये प्रगती करण्यासाठी आणि रुग्णांच्या सुविधांमध्ये सुधारणा घडवण्यासाठी, सातत्याने शिक्षण व नावीन्याचा ध्यास घेणाऱ्या संस्कृतीचे संवर्धन करण्याचाही आमचा दृढ निश्चय आहे.

म्हणूनच तर, मुंबई आणि अहमदाबाद येथे एकात्मिक आरोग्य मंदिरे विकसित करण्याचा मनोदय जाहीर करताना आम्हाला सार्थ अभिमान वाटत आहे आणि भविष्यात भारतभरात अशी अनेक मंदिरे स्थापन केली जातील. ह्या प्रगत अद्ययावत सुविधांमध्ये, **मेयो क्लिनिक** द्वारा ॲडवायजरी सपोर्टसह, जागतिक दर्जाची सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल्स, टीचिंग हॉस्पिटल्स, मेडिकल कॉलेजेस, नर्सिंग कॉलेजेस, अत्याधुनिक रीसर्च व इनक्युबेशन सेंटर्स ह्यांना स्थान दिले जाईल.

सेवेच्या प्रति असलेली आमची वचनबद्धता आम्हाला सर्वसमावेशक आरोग्य इकोसिस्टिम ची दूरदृष्टी बहाल करते, जी भारताला आरोग्यसंपन्न बनवण्यासाठी आरोग्य गरजांच्या पूर्ततेकरिता आयोजण्यात आली आहे.

- **5 दशलक्ष चौ. फूट मध्ये पसरलेले**
- **2,000 वैद्यकीय विद्यार्थी**
- **2,000 बेड्स**
- **20 लाखांपेक्षाही अधिक जीवनांवर सकारात्मक परिणाम होईल**







**सेवा साधना आहे, सेवा प्रार्थना आहे आणि सेवा हीच परमात्मा आहे.**

## संक्षिप्त वृत्त...

### किटकनाशक वापराबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**परभणी,/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त इंसेक्टिसाइइस इंडीया लिमिटेड ट्रॅक्टर ब्रँड कंपनीच्या वतीने शुक्रवार २१ फेब्रुवारी रोजी तालुक्यातील भोसी गावात स्टेवर्डशिप डे अंतर्गत किटकनाशकाच्या सुरक्षित वापराबाबत तज्ञांद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास सरपंच चंद्रकला रामप्रसाद सोनुळे, उपसरपंच मिराबाई ठोंबरे व ग्राम पंचायत सदस्य, शेतकरी व विक्रेते उपस्थीत . यावेळी इंसेक्टिसाइइस इडीया लिमीटेडचे रिजनल अधिकारी साजिद खान पठाण यांनी शेतकऱ्यांना कीटकनाशक जबाबदारीने कसा वापर करावा याचे प्रात्याक्षिके करून माहिती दिली. फवारणी करतांना काय करावे व काय करू नये याबाबत माहिती दिली. शिवाय कीटकनाशके फवारणी नंतर हात व तोंड स्वच्छ धुवावे, कीटकनाशके सुरक्षित ठिकाणी आणी मुलांच्या पासून दूर ठेवावा, तर रिकाम्या बाटल्या इतरत्र शेतात कोठेही टाकण्यात येऊ नये, फवारणीनंतर लगेच जेवण करण्याचे टाळावे, असे आवाहन केले. त्याच बरोबर कीटकनाशके यांची योग्य ओळख त्यांच्या प्रभावीतेच्या मर्यादा अणि संभाव्य जोखमी बाबत माहीती दिली. कीटकनाशके रंगानुसार वर्गीकरण करण्यात आले असून लाल रंग अत्यंत विषारी, पिवळा रंग जास्त विषारी, निळा मध्यम आणि हिरवा कमी विषारी दर्शवतो, असे म्हटले.

शेती उत्पादन वाढीस लागावे व आरोग्यावरही परिणाम होणार नाही यासाठी सुरक्षित शेतीचा संकल्प यावेळी शेतकऱ्यांनी . किटकनाशक विक्रेते गजानन डुब्बेवार, शरद ठोंबरे, शेतकरी भास्करराव ठोंबरे याच्यासह भोसी गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी पर्यंत केले.

### पालक सचिवांद्वारे मुळी बंधाऱ्याची पाहणी

**परभणी,/प्रतिनिधी :** जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव दीपक कपूर यांनी शुक्रवारी (दि.२१) दुपारी मुळी येथे भेट देऊन निम्न पातळी बंधाऱ्याची पाहणी केली.

यावेळी मुख्य अभियंता लाभक्षेत्र विकास जयंत गवळी, अधीक्षक अभियंता अ. आ. दाभाडे, अधीक्षक अभियंता यांत्रिक मंडळ नांदेड पी. पी. देशमाने, अधीक्षक अभियंता लाभक्षेत्र विभाग मंडळाचे स. को. सब्बीनवार, अधीक्षक अभियंता बीड प्रकल्प मंडळ आय. . चिश्ती, अधीक्षक अभियंता गुणयांत्रिक मंडळ, संभाजीनगर व्ही. एच. पाटील. अधीक्षक अभियंता बीड श्रीमती प. को. जगताप, कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे परभणी सी. एन. ताटे, कार्यकारी अभियंता माजलगाव पी. बी.लांब, कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग नांदेड आय. . आत्राम, तहसीलदार उषाकिरण शृंगारे आणि कंत्राटदार गौस मोहियोद्दिन आदि उपस्थित .

पैठणच्या नाथसागर धरणाच्या व्यतिरिक्त गोदावरी नदीवर नांदेडच्या विष्णुपुरी प्रकल्पापर्यंत १४ बंधारे असून, मुळी येथील १० वा बंधारा . हा बंधारा गोडबोले पद्धतीचे गेट असलेला पायलट प्रोजेक्ट आहे.२०१२ आणि २०१६ मध्ये दोन वेळा हा बंधारा महापुराच्या पाण्याने क्षतिग्रस्त झाला. वेळोवेळी बांधकामासाठी मिळालेल्या निधीतून हा बंधारा १९ ऑक्टोबर २०२४ रोजी पूर्ण झाल्याचे सांगून येथे ११.३५ दलघमी पाणीसाठा . १०३ कोटी रुपयांमध्ये हा बंधारा पूर्ण झाला असून, येथील पाण्यामुळे १७०५ हेक्टर सिंचन होत असल्याचे कार्यकारी अभियंता लघुपाट बंधारे परभणी सी. एन. ताटे यांनी सांगितले. , पालक सचिव दीपक कपूर यांनी मुळी निम्न पातळी बंधाऱ्यावर जलपूजन केले.

### श्री.सरस्वती प्राथमिक विद्यालयाचे सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात साजरा



**गंगाखेड,/प्रतिनिधी :** शहरातील श्री सरस्वती प्राथमिक विद्यालयाचे सांस्कृतिक कार्यक्रम (दिनांक २१फेब्रुवारी शुक्रवार) रोजी पूजा मंगल कार्यालय येथे मोठ्या उस्ताहात साजरे झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव दिपक तापडिया यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी भगवान ठूले, संचालक संतोष तापडिया, सुभाष नळदकर, क्रीडा शिक्षक बाळासाहेब राखे, सदस्य अनिल गंगाखेडकर, वसंत फ टके यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेच्या पूजनाने करण्यात आली सुरुवातीला श्री गणेशा गाण्यावर लहान चिमुकल्याने नृत्य सादर करत सांस्कृतिक कार्यक्रमास सुरुवात केली पुढे लहान विद्यार्थ्यांनी श्री गणेशा, लल्लाटी भंडार, दैवत त्र आमचे दैवत छत्रपती, आई तुळजाभवानी, दिल दिया है जान भी देंगे सह धार्मिक, देशभक्तीपर गीत अशा विविध गाण्यावर नृत्य सादर करत आपले कलागुण सादर केले व उपस्थित शिक्षक व पालक वर्गाची मने जिंकत वाहवाही मिळवली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती रुपाली महाजन यांनी केले तर आभार शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम कांगणे यांनी मानले कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक दत्ता भंडारवाड,लक्ष्मीकांत कोल्हे, सूर्यकांत बडवणे, गिरीश करंडे, कोमल आचार्य,लक्ष्मी मुधोळकर ,रेखा गायकवाड,रेखा कनकदंडे, दीपांजली कराड,देवळे मॅडम,करंडे मॅडम, शिंदे मॅडम,चोरघडे मॅडम यांच्यासह कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले आपल्या पाल्याचे कला गुण पाहण्यासाठी पालकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती

### परभणी जिल्हयात वाढले तापमान

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरात काही दिवसापासून चांगलेच तापमान वाढलेले दिसून येत आहे. त्यातच या दिवसा होणाऱ्या गरमी तसेच रात्री होणाऱ्या थंडीचा त्रास मात्र सर्वसामान्य नागरिकांना चांगलाच होत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत अशाच प्रकारचे वातावरण जिल्हावासियांना मिळणार असे वनामकृवि हवामान खात्याने कळविले.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# एकाच रात्रीत मुख्य रस्त्यावर तीन ठिकाणी चोऱ्या दोन डिव्हीआर सह, रोख ५० हजार लंपास







**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर ,/प्रतिनिधी-:** शहरातील पोलीस स्थानका पासून हाकेच्या अंतरावर मुख्य रस्त्यावर असलेले एक वाइन शॉप,देशी दारूचे ठोक विक्रेत्याचे कार्यालय,देशी दारू विक्री केंद्र अश्या तीन ठिकाणी अज्ञात चोरट्याने प्रवेश करून तिन्ही ठिकाणचे गल्ल्यातील एकूण अंदाजे रक्कम ५० हजार रु नगदी व दोन डिव्हीआर लंपास केल्याची घटना शुक्रवार दि २१ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली या देशी दारू विक्रेता देवेंद्र नारायण अण्णा भुरे यांच्या फिर्यादीवरून जिंतूर पोलिसांत अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे या बाबत अधिक माहिती अशी की शहरातील मुख्य रस्त्यावर पोलीस स्थानकापासून हाकेच्या अंतरावर सत्यनारायण शर्मा यांचे सदानंद वाइन शॉप असून या ठिकाणी देशी विदेशी दारू विक्री केली जाते नेहमी प्रमाणे गुरुवार दि २० फेब्रुवारी रोजी रात्री दुकान बंद करून घरी गेले असता मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यानी दुकानाच्या पाठीमागील बाजूस चढून दुकानाचे पत्रे व आतिल सिलिग कापून दुकानात प्रवेश केला दुकानाच्या गल्ल्यातील चिल्लर ३० हजार रु व एक सीसीटीव्ही डिव्हीआर लंपास केला तर दुसऱ्या घटनेत देवेन्द्र नारायण अण्णा भुरे यांच्या देशी दारू विक्री केंद्राचे कुलूप तोडून दुकानात प्रवेश करत गल्ल्यातील ८ हजार रु चिल्लर व एक डिव्हीआर कॅमेरयाचा मेमोरी कार्ड लंपास केले तर तिसरी घटना याच देशी दारूच्या शेजारीच मनाली ट्रेडर्स नावाचे देशी दारूचे ठोक विक्रेते देवेन्द्र भुरे यांचे कार्यालय आहे चोरट्यानी या कार्यालयाचे कुलूप तोडून कार्यालयात प्रवेश करून नगद ८ हजार रु चोरून नेऊन समान अस्ताव्यस्त फ केले या तिन्ही घटना शुक्रवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आल्या एकाच रात्रीत मुख्य रस्त्यावरील तीन दुकानात चोऱ्या झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे घटनास्थळी फौजदार देशपांडे व ठसे तज्ञानी भेट दिली दरम्यान मागील काही दिवसांपासून चोरीच्या घटनेत वाढ झाली असल्यामुळे पोलिसांचा कामगिरीवर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे चौकट चोरटे सुशिक्षित...? या तिन्ही ठिकाणी चोऱ्या करतांना चोरट्यानी स्वतः च्या चेहऱ्याला कापड गुंडाळलेले रस्त्यावरील इतर ठिकाणच्या सीसीटीव्ही मध्ये दिसून येत असून चोरट्यानी तिन्ही ठिकाणच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे डिव्हीआर सुद्धा चोरून नेल्याने हे चोरटे सुशिक्षित असावे असा अंदाज बांधला जात आहे.

**पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवण्याची गरज**

**मागील काही दिवसांपासून शहरात विविध ठिकाणी चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे यामुळे व्यापाऱ्यासह नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे म्हणून पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी शहरातील नागरिक करत आहेत**

### पालकमंत्री मेघना दिदी बोर्डीकर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात भरणार जनतेचा दरबार

**परभणी,/प्रतिनिधी :** पालकमंत्री मेघना दिदी बोर्डीकर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि .२४) जिल्हाधिकारी कार्यालयात जनता दरबार भरणार आहे.



जिल्ह्यातील जनतेच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना दिदी साकोरे-बोर्डीकर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि. २४) दुपारी १वा. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जनता दरबारचे आयोजन करण्यात आले . समस्यांचे निराकरण करण्यासाठी नागरिकांनी अर्जासह जनता दरबारास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केले .

## जिंतुर दर्गा हजरत सय्यद अली कादरी रहे. प्रीमियम लिग क्रिकेट स्पर्धाचे आयोजन

**जिंतूर,/प्रतिनिधी-** येथील दर्गाह हजरत सय्यद अली कादरी रहे. उरूस प्रीमियर लीग निमित्त क्रिकेट स्पर्धाचे आयोजन आर्यन क्रिकेट क्लबच्या वतीने करण्यात आले असून सामने टेनिस बॉल ने खेळण्यात येणार आहे

क्रिकेट सामने मैनापुरी माता मंदिर परिसर परभणी रोड जिंतुर येथे आयोजन करण्यात आले असून या क्रिकेट स्पर्धा सामन्याचे पहिले बक्षीस, २१२१२/- रु सईदखान ट प्रदेशअध्यक्ष अल्पसंख्याक शिवसेना शिंदे गट व दुसरे बक्षीस ११११११ /- रु टीकाखान प्रदेशउपाध्यक्ष शिवसेना शिंदे गट यांच्या वतीने देण्यात येणार असल्याची माहिती कमिटी अध्यक्ष मोसिनखान पठाण युवा कार्यकर्ता यांनी दिली असून हे सामन्याचे युट्युबवर लाईव्ह प्रक्षेपण होणार आहे या प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धे चे उद्घाटन दि. २२/०२/२५ नगरसेवक तथा प्रदेश उपाध्यक्ष शिवसेना शिंदे गट टिकाखान (भैया) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले या वेळी नगरसेवक कलीम काझी ,राजेश वैष्णव, सुनील काजळे , सय्यद गौस, मोहसीन भैया खान , जब्बार भाई कॉन्ट्रॅक्टर, माजीद भाई बिल्डर,नयुम पठाण , तौफिक पहिलवान व आर्यन क्रिकेट क्लब सदस्य व क्रीडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते





# जिल्ह्यातील एकही गरजू लाभार्थी घरकूलापासून वंचित राहणार नाही- पालकमंत्री मेघना बोर्डीकर

**घरकुलांच्या मंजुरीपत्रांचे लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात पालकमंत्री यांच्या हस्ते वितरण**

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-** राज्य शासनाच्या १०० दिवसीय कार्यक्रमाच्या माध्यमातून आपल्या जिल्ह्यातील विधवा, परित्यक्त्या, दिव्यांग महिलांना प्राधान्याने प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ दिला जाईल. या योजनेपासून जिल्ह्यातील एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथूर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक रश्मी खांडेकर, नरेगा गट विकास अधिकारी जयंत गाडे, एनजीओ सदस्य भरत कच्छवे उपस्थित . पालकमंत्री म्हणाल्या, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यातील विविध घरकुल योजनांच्या माध्यमातून १ पेक्षा जास्त लाभार्थ्यांना घरकूल योजनेचा लाभ देण्यात आला . दीनदयाळ योजनेच्या माध्यमातूनही जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. अत्यंत गरजू व्यक्तीला पहिल्या टप्प्यात प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळणे आवश्यक . चूकीच्या पध्दतीने घरकुलाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची तपासणी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याच्याही सूचना यावेळी त्यांनी प्रशासनाला दिल्या.

पालकमंत्री यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना मंजुरी पत्र यावेळी देण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ (२०२४-२५) अंतर्गत जिल्ह्याला ५२१७९ घरकुलाचे उद्दिष्ट देण्यांत आले आहे, त्यापैकी ४४८६१ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे तर आजच्या कार्यक्रमात जिल्ह्यातील २३ हजार ४२० लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याच्या लाभांचे वितरण करण्यात आले . केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, ट विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्य मंत्री योगेश कदम यांच्या उपस्थितीत महाआवास अभियान २०२४-२५ अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ मधील राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना घरकुलाचे मंजुरीपत्र व किमान १० लक्ष घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरणाचा गृहोत्सव कार्यक्रमाचे पुणे येथून थेट प्रक्षेपन व्हिडीओ कॉन्फरंसद्वारे यावेळी झाले.

### हर घर जल' अंतर्गत अपूर्ण कामे पूर्ण करा

### प्रधान सचिवांकडे निवेदनाद्वारे लक्ष

**परभणी,/प्रतिनिधी :** 'हर घर जल जीवन' मशन अंतर्गत परभणी जिल्ह्यातील अपूर्ण कामे तात्काळ मार्गी लावावीत, अशी मागणी जय किसान आंदोलन स्वराज इंडियाचे अध्यक्ष गोविंद गिरी यांनी प्रधान सचिवांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली.

२०२१-२२ पासून या जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणी योजनांच्या कामांना प्रारंभ झाला. परंतु, योजनेंतर्गत केवळ २५ ते ३० टक्केच कामे आतापर्यंत पूर्ण झाली . उर्वरीत कामे पुढे सरकली नाहीत, आज ना उद्या कामे होतील, या अपेक्षेने ग्रामस्थ मौन बाळगून . परंतु, आता कामे पूर्ण होत नसल्याने ग्रामीण भागातील ग्रामस्थांच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत, असे गिरी यांनी या निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले.

या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये पुढील समस्या आढळून आल्या आहेत, असे स्पष्ट करतेवेळी कंत्राटदाराच्या अनागोंदी कारभारामुळे योजना अपूर्ण आहेत,काही ठिकाणी कंत्राटदार त्यांच्या फायद्याची कामे पूर्ण करून उर्वरित कामे तसेच ठेवत आहेत, ज्यामध्ये कमी नफा आहे, अशा भागातील कामे दुर्लक्षित केली जात . त्यामुळे अनेक गावे जल जीवन मिशनच्या फायद्यापासून वंचित राहतील, अशी भिती निर्माण झाली . अर्धवट कामे व निधीवरील कपातएकूण कामाच्या दहा टक्के निधी जिल्हा परिषद वजा करून घेते. त्यामुळे कंत्राटदाराला आर्थिक भार येतो आणि ते अर्धवट कामे सोडून देतात. याचा थेट परिणाम ग्रामीण जनतेला होतो आहे, असेही निवेदनात म्हटले . २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी जल जीवन मिशन योजना २०२८ पर्यंत सुरू ठेवण्याचे जाहीर केले . त्यामुळे विद्यमान अपूर्ण कामे लांबत जाऊ नयेत, यासाठी जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाने तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षाही निवेदनातून व्यक्त करण्यात आली.

परभणी जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गत राहिलेली कामे तातडीने पूर्ण करावीत. ज्या गावांना अद्यापही या योजनेचा लाभ मिळालेला नाही, तेथील नळपाणी योजना त्वरित कार्यान्वित करावी. कॉन्ट्रॅक्टरच्या अपूर्ण कामांची चौकशी करून संबंधितांवर कार्यवाही करावी. जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाने ठोस पावले उचलून जनतेस पिण्याच्या पाण्याची सुविधा पुरवावी, आदी मागण्याही गिरी यांनी या निवेदनाद्वारे केल्या .

# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, २४ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३३० | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## हिमाचलप्रदेश : मंडी येथे ३.७ तीव्रतेचा भूकंप



मंडी : हिमाचल प्रदेशच्या मंडी येथे आज, रविवारी सकाळी भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ३. ७ इतकी मोजण्यात आली. जमिनीच्या आत त्याची खोली ५ किलोमीटर होती. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्रानुसार (एनसीएस) सकाळी ८ वाजून ४२ मिनीटांनी सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले. त्याचे केंद्र सुंदरनगर येथील किआर्गी होते. यासंदर्भात एका अधिकाऱ्याने सांगितले की भूकंपाचे केंद्र ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणाजवळ एक तलाव आहे. या प्रदेशात दर २ ते ३ वर्षांनी एकदा लहान आणि कमी तीव्रतेचे भूकंप होतात. यापूर्वी २०१५ मध्ये येथे ३. ३ तीव्रतेचा भूकंप झाला होता. हिमाचल प्रदेशसोबतच दिल्ली-एनसीआर तसेच शेजारील राज्यांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. दिल्लीत काही सेकंदांपर्यंत भूकंपाचे धक्के इतके तीव्र होते की इमारतींच्या आत तीव्र कंपने जाणवली. पहाटे ५ वाजून ३६ मिनीटांनी हा भूकंप जाणवला. दिल्लीच्या धौला कुआं येथील दुर्गाबाई देशमुख विशेष शिक्षण महाविद्यालयाजवळ भूकंपाचे केंद्र असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले. हिमाचल प्रदेशात भूकंपाचे धक्के बसल्यानंतर लोक घराबाहेर पडले. अनेक ठिकाणी भूकंपाच्या कमी तीव्रतेमुळे, बहुतेक लोकांना धक्के जाणवू शकले नाहीत. राज्यातील चंबा, शिमला, कुल्लू, लाहौल स्पीती, कांगडा, किन्नौर आणि मंडी येथील अनेक भाग भूकंपाच्या दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील असलेल्या झोन-५ मध्ये येतात. म्हणूनच येथे वारंवार भूकंप होत राहतात.

# दिल्ली विधानसभेत पहिल्याच दिवशी मांडणार कॅगचा अहवाल : मुख्यमंत्री

नवी दिल्ली, २३ फेब्रुवारी : दिल्लीच्या नव्या सरकारने त्यांच्या पहिल्या विधानसभेच्या अधिवेशनात मोठे पाऊल उचलण्याची घोषणा केली आहे. दिल्लीत उद्या,सोमवारपासून सुरू होणाऱ्या विधानसभेच्या अधिवेशनात प्रलंबित असलेले सीएजीचे (कॅग) अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले जातील. दिल्लीच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी आज, रविवारी ही माहिती दिली.




याबाबत मुख्यमंत्री रेखा गुप्ता म्हणाल्या की, सोमवारपासून सुरू होणाऱ्या ३ दिवसांच्या विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आमदारांचा शपथविधी समारंभ होईल. यानंतर सभापती आणि उपसभापतींची निवड होईल. आम्ही पहिल्याच विधानसभा अधिवेशनात कॅगचा अहवाल सादर करू, जो येणारा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. शपथविधी सोहळ्यापासून दिल्लीत भाजप सरकार कार्यरत आहे. आम आदमी पक्षाच्या कार्यकाळात झालेल्या प्रत्येक भ्रष्टाचाराचा हिशेब दिला जाईल, असे रेखा गुप्तांनी स्पष्ट केले आहे. आता भाजपने १४ प्रलंबित कॅग अहवाल विधानसभेत सादर करण्याची रणनीती आखली आहे. त्यानुसार १४ प्रलंबित कॅग अहवालांपैकी ११ अहवाल केजरीवाल यांच्या कार्यकाळातील आहेत, तर ३ अहवाल आतिशी यांच्या कार्यकाळातील आहेत. भाजपचा आरोप आहे की आपने हे अहवाल जाणूनबुजून सादर करणे टाळण्यात आले होते.

दिल्ली सरकारच्या पहिल्या अधिवेशनात सर्व आमदार शपथ घेतील, यानंतर सभापती आणि उपसभापतींची निवड होईल. सोमवारी सकाळी हंगामी अध्यक्ष अरविंदर सिंग लवली यांना उपराज्यपाल शपथ देतील असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच दिल्लीतील जनतेसाठी खूप काम करण्याची गरज आहे. आम्ही आमचे काम दिल्लीतील लोकांच्या हक्कांपासून सुरू करू. आम्ही आमचे वचन पूर्ण करणार आहोत, आम्ही पहिल्याच विधानसभा अधिवेशनात कॅगचा अहवाल सादर करू, जो येणारा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे. या विधानसभा अधिवेशनात दिल्लीतील जनतेसाठी महत्त्वाची असलेली सर्व कामे केली जातील असेही त्यांनी सांगितले. दरम्यान

रेखा गुप्ता म्हणाल्या की, 'मागील सरकारांनी लोकांच्या कष्टाच्या पैशाचा गैरवापर केला. त्यांना जनतेला प्रत्येक रुपयाचा हिशोब द्यावा लागेल असा इशारा त्यांनी दिला.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (४९) घंटा

१९३७ सालची घटना. पुण्याला सोन्या मारुतीच्या मंदिराजवळ पूर्व-पश्चिम- उत्तर-दक्षिण नव्वद फुटापर्यंत सार्वजनिक ठिकाणी कोणतेही वाद्य वाजवायचे नाही; असा दंडक सरकारने केला होता

मंदिराच्या घंटेच्या नादाने मुसलमानांच्या नमाजात व्यत्यय येतो हे दाखवलेले कारण अगदीच हास्यास्पद होते. मुसलमान अकारण दंगा करतात; म्हणून त्यांच्यावर निर्बंध घालण्याऐवजी हिंदूंवरच असा दंडुका उभारणे हे संपूर्ण अन्याय्य होते. दंडुकेशाहीला व अरेरावीला ठोकरुन लावण्यासाठी हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर सोन्या मारुतीच्या मंदिरातील घंटा दररोज वाजवून काही संघ स्वयंसेवकांनी सत्याग्रहाला सुरुवात केली व हळूहळू या सत्याग्रहात एक सहस्त्राहून अधिक जणांनी स्वयंप्रेरणेनी भाग घेतला होता. ते सर्वजण हिंदू होते हे नक्की. साहित्यसम्राट श्री.न. चि. केळकर यांनी हा हुकूम मूर्खपणाचा आणि नामुष्कीचा आहे; असे स्पष्ट मत लिहिलेले पत्रक सरकारला पाठवले होते. त्यावेळी त्यांनी दुसऱ्या पत्रकात छोट्याशा घंटेला उद्देशून म्हंटले होते की:-

बये चिमुकले घंटे काढिते,<br>
मंजुळ अपुला ध्वनी।<br>
तुझ्या गुणे जाऊ दे,<br>
हुकूमशाही उलथुनी ।। या सत्याग्रहानी पुण्यातील वातावरण चांगलेच उत्तेजित झाले होते. व सरकारला सुद्धा असा कायदा लादणे योग्य नाही हे पटले होते. व संघाचे मनुष्य निर्माण ना भूले हे तत्व मार्गस्थ होत होते.

क्रमशः


लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती


## एनपीएससोबत तुमचा निवृत्ती नियोजन प्रवास

पुणे : राष्ट्रीय पेन्शन योजना आणि अटल पेन्शन योजना खाती हाताळणारी सर्वात मोठी सेंट्रल रेकॉर्डकीपिंग एजन्सी प्रोटीन ई-गव्हर्नन्स टेक्नॉलॉजीज लिमिटेड, (पूर्वीः एनएसडीएल ई-गव्हर्नन्स इन्फ्रास्ट्रक्चर) ने त्यांचे पेन्शन व्यवस्थापन ॲप - 'एनपीएस बाय प्रोटीन' मध्ये सुधारणा केली आहे आणि विशेषतः आजच्या डिजिटली जाणकार मिलेनियल्ससाठी अनेक नवीन वैशिष्ट्ये जोडली आहेत. तुम्ही आधीच एनपीएस शी संबंधित असाल किंवा एनपीएससोबत तुमचा निवृत्ती नियोजन प्रवास सुरू करत असाल, हे नवीन ॲप तुम्हाला एकाच ठिकाणी सर्व उपाय देईल. अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही ग्राहकांसाठी उपलब्ध असलेले हे नवीन ॲप अत्यंत वापरकर्ता-अनुकूल इंटरफेस, अंतर्ज्ञानी नेव्हिगेशन आणि सुधारित सुरक्षा वैशिष्ट्यांसह प्रदान करते. आजच्या तरुण पिढीसाठी विशेषतः डिझाइन केलेले, हे ॲप त्यांच्यासाठी नवीन एनपीएस खाते तयार करणे, योगदान देणे आणि ते व्यवस्थापित करणे ही प्रक्रिया खूप सोपी करेल.

## गरीब माणसाचे स्वप्न पूर्ण केले - गिरीश महाजन

नाशिक, २३ फेब्रुवारी : हक्काचे घर हे गरिबाला बंगल्यासारखेच आहे. महा आवास अभियान अंतर्गत गरीब माणसाचे स्वप्न आपण पूर्ण करत आहोत. ग्रामविकास मंत्री असताना देशात पहिला क्रमांक आला होता आज या अभियानात नाशिक जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर असून नाशिक विभागाने विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली उद्दिष्ट पूर्ती मध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे जलसंपदा तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी अभिनंदन केले.

आज नाशिक जिह्यातील १ लाख ४५ हजार ७२७ घरकुल लाभार्थ्यांना मंजूरी पत्र देण्यात आले तर ८० हजार घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर घरकुलाच्या पहिला हप्त्याचे वितरण करण्यात आले.

## लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी फ्रान्सच्या अधिकृत दौऱ्यावर रवाना

नवी दिल्ली, २३ फेब्रुवारी : भारत आणि फ्रान्स यांच्यातील संरक्षण सहकार्य अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने भारतीय लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी (सीओएएस) २४ ते २७ फेब्रुवारी २०२५ दरम्यानच्या फ्रान्सच्या अधिकृत दौऱ्यासाठी रवाना झाले आहेत.

२४ फेब्रुवारी २०२५ रोजी सीओएएस पॅरिसमधील लेझ इनव्हॅलिड्स येथे फ्रान्सच्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांशी संवाद साधतील. गार्ड ऑफ ऑनर नंतर जनरल पियरे शिल, फ्रेंच आर्मी चीफ (सीइएमएटी) यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा होतील. या बैठकीचा मुख्य उद्देश दोन्ही देशांमधील लष्करी संबंध अधिक दृढ करणे आणि सामरिक सहकार्याचे नवे मार्ग शोधणे हा आहे. यानंतर इकोल मिलिटरै ही प्रतिष्ठित लष्करी प्रशिक्षण संस्था आणि लष्करी संकुल येथे ते भेट देतील, जिथे त्यांना फ्युचर कॉम्बॅट कमांड (सीसीएफ) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती दिली जाईल. याशिवाय, ते फ्रेंच लष्कराच्या तांत्रिक विभाग (एसटीएटी) येथे भेट देऊन तांत्रिक नवोपक्रमांवर संक्षिप्त माहिती घेतील. त्यानंतर ते व्हर्साइल्स येथील बॅटल लॅब टेरे येथे लष्करी संशोधन आणि विकासाबाबत माहिती घेतील.

२५ फेब्रुवारी २०२५ रोजी, जनरल द्विवेदी मार्सेल येथे प्रवास करतील. जिथे त्यांना फ्रेंच लष्कराच्या तिसऱ्या विभागाला भेट देतील. येथे त्यांना तिसऱ्या विभागाच्या प्रमुख जबाबदाऱ्या, त्यांची मोहीम आणि कार्यपद्धती याबाबत सविस्तर माहिती दिली जाईल. त्याचप्रमाणे, भारत-फ्रान्स संयुक्त लष्करी सराव (शक्ती), संयुक्त प्रशिक्षण उपक्रम, तसेच फ्रेंच लष्कराच्या आधुनिकीकरण प्रकल्प (स्कॉर्पियन) यासंदर्भातही त्यांना माहिती दिली जाईल.

## प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षितेसाठी कर्नाटक राज्यातील बस फेऱ्या रद्द : सरनाईक

मुंबई, २३ फेब्रुवारी : काल रात्री कर्नाटक राज्यातील चित्रदुर्ग येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चालकांना कर्तव्यावर असताना काही समाजकंटकांनी धक्काबुक्की करून काळे फासले. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून त्याचा आम्ही निषेध करतो. तथापि, प्रवासी व आमच्या कर्मचाऱ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन पुढील अनिश्चित काळासाठी कोल्हापूर विभागातून कर्नाटक राज्यात जाणाऱ्या महाराष्ट्राच्या एसटी बसेस रद्द करण्यात याव्यात असे निर्देश राज्याचे परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी एस. टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (प्रभारी) श्री. विवेक भीमनवार यांना दिले आहेत.

दरम्यान परिवहन मंत्री श्री .सरनाईक यांनी या घटनेत जखमी झालेले चालक श्री.भास्कर जाधव यांच्याशी दूरध्वनीवर बोलून त्यांना धीर दिला. तसेच या प्रकरणात तुम्ही एकटे नसून, आपले सरकार तुमच्या खंबीरपणे पाठीशी आहे. अशी ग्वाही देखील दिली. तसेच कर्नाटक शासन या संदर्भात स्पष्ट भूमिका घेऊन जोपर्यंत आपल्या शासनाची चर्चा करत नाही तोपर्यंत त्या भागातील महाराष्ट्राच्या एसटी बसेस रद्द करण्यात येतील.* असे निर्देश देखील त्यांनी एसटी महामंडळाला यावेळी दिले.

काल रात्री दि.२१/०२/२०२५ रोजी ठिक २१.१० वाजता मुंबई आगाराची बस बंगळुरू -मुंबई येत असताना (बस क्रमांकचक्र१४ घ ट ७७१४) ही बस चित्रदुर्ग च्या पाठीमागे दोन किलोमीटर आली असता ,तथाकथित कर्नाटक संघटनेचे कार्यकर्ते यांनी गाडी थांबवून बस व चालकाला काळे फासले . तसेच कर्तव्यावर असणाऱ्या चालक श्री. भास्कर जाधव यांना मारहाण देखील करण्यात आली. (दोघेही कोल्हापूर आगारात कार्यरत आहेत.) त्यानंतर वरिष्ठांच्या सुचनेनुसार त्यांनी संबंधित पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार नोंदवली आहे. आज सकाळी विभाग नियंत्रक कोल्हापूर यांनी बस व चालक - वाहक यांना सुखरूप कोल्हापूर येथे आणले. तथापि, सीमावर्ती भागातील तणाव लक्षात घेता, परिवहन मंत्री श्री प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास करणारे प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोल्हापुरातून कर्नाटक राज्यात जाणाऱ्या एसटी बसेस रद्द करण्यात आल्या आहेत. असे एसटी महामंडळ कडून कळवण्यात आले आहे.

## वोक्हार्ट हॉस्पिटल, एक्सलन्स इन क्रिटिकल केअर अवॉर्ड'' ने सन्मानित

मध्य भारतातील अग्रगण्य आरोग्यसेवा संस्था असलेले वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूरला असोसिएशन ऑफ हेल्थकेअर प्रोव्हायडर्स इंडियाने (एएचपीआय) प्रतिष्ठित अशा एक्सलन्स इन क्रिटिकल केअर अवॉर्ड सन्मानाने गौरवान्वित केले आहे. या पुरस्काराने रुग्णसेवेतील त्यांच्या सातत्यपूर्ण उत्कृष्टतेला अधोरेखित केले आहे व नागपूर तसेच महाराष्ट्रातील अन्य भागांमध्ये उत्कृष्ट क्रिटिकल केअर सेवा प्रदान करणारे आघाडीचे रुग्णालय म्हणून प्रस्थापित केले आहे. गंभीर आजाराने त्रस्त रुग्णांना सर्वोत्तम वैद्यकीय सेवा देण्याच्या आमच्या कटिबद्धतेला या सन्मानाने अधिक दृढ केले आहे. एएचपीआयकडून मिळालेली ही मान्यता आमच्या उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा, सुरक्षितता आणि रुग्ण-केंद्रित दृष्टिकोनाची पोचपावती आहे.

## शेतजमिनीचा बेकायदेशीर खरेदी-विक्रीचा व्यवहार

### बिडकीन पोलिसांकडे तक्रार

छत्रपती संभाजीनगर : पैठण तालुक्यातील लोहगाव आणि तोंडोळी भागात अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनीची बेकायदेशीर खरेदी-विक्री झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. तोंडोळी शिवारातील एका शेतजमिनीच्या बेकायदेशीर विक्री प्रकरणावरून हा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी मंगल सखाराम तांबे व संतोष नामदेव जगताप यांनी ३० जानेवारी २५ रोजी भीमशक्ती या सामाजिक संघटनेमार्फत बिडकीन पोलिसांकडे लेखी तक्रार केली आहे.



याप्रकरणी अधिक माहिती अशी की, तोंडोळी शिवारात सखाराम तुळशीराम तांबे यांची गट नंबर ३७४/१ मध्ये ३२ आर व ३७४/२ मध्ये ५७ आर. शेतजमिन आहे. ही शेतजमिन छत्रपती संभाजीनगमधील सुभाष गोपालचंद्र श्रॉफ (रा. गुलाब विला, आरटीओ ऑफिस समोर, रेल्वस्टेशन रोड, बन्सीलाल नगर) यांनी जमीन मालक सखाराम तांबे, मुलगी मंगल तांबे-जगताप आणि जावई संतोश जगताप यांना कोणतीही कल्पना न देता राहिदास उत्तमराव आडेराव यांना ३४ लाख ४२ हजार ५०० रु. ला लिहून दिली. यासाठी आडेराव यांच्याकडून रोख ५० हजार रुपये घेवून इसारपावतीही करून दिली. याप्रकरणी सुभाष श्रॉफ यांच्यासह साक्षीदार संदीप तुकाराम गरड, गजानन मुंगल आणि नोटरी सुनिता एस. राजेजाधव यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून न्याय देण्याची आग्रही मागणी मंगल तांबे, संतोष जगताप यांनी तक्रारीद्वारे केली आहे. भीमशक्ती सामाजिक संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष दिनकर ओंकार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वतः बिडकीन पोलीस ठाण्यात येवून सहायक पोलीस निरीक्षक शेळके यांना निवेदन दिले. या प्रकरणी बिडकीन पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## एमजीएममध्ये अध्यापक विकास प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न

### 'इनोव्हेशन इन हॉस्पिटॅलिटी रिसर्च ट्रेंड्स, टूल्स अँड टेक्निक्स' विषयावरील प्रशिक्षण संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.२३ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या वतीने 'इनोव्हेशन इन हॉस्पिटॅलिटी रिसर्च ट्रेंड्स, टूल्स अँड टेक्निक्स' या विषयावरील अध्यापक विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ.सुवर्णा साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत विनोबा भावे सभागृह येथे संपन्न झाले.



या कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, अधिष्ठाता डॉ.रणीत किशोर, संचालक डॉ.कपिलेश मंगल, प्रा.पुष्पा गोरे, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनपर सत्रात टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ.सुवर्णा साठे यांनी 'हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्री अँड इट्स इवोल्वविंग रिसर्च लँडस्केप' या विषयावर उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी इमर्जिंग ट्रेंड्स, डिजिटल परिवर्तन, तांत्रिक नवोपक्रम तसेच शाश्वत संशोधनाच्या दृष्टिकोनाची गरज स्पष्ट केली. कोरोना महामारीनंतर स्वच्छतेच्या वाढत्या महत्त्वामुळे ग्राहकांच्या अनुभवात झालेल्या बदलांवरही त्यांनी प्रकाश टाकला. सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तर सत्रात त्यांनी सहभागी प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली.

हॉटेल मॅनेजमेंट क्षेत्रामध्ये करियरच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहेत. एमजीएम विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कटिबद्ध राहिलेले आहे. बदलेल्या जागतिक मागण्या आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे शिक्षण प्रणालीचे आधुनिकीकरण होण्यास सुरूवात झालेली आहे. कौशल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थी रोजगार व स्वयंरोजगार क्षेत्रासाठी सक्षम होत आहे. अशा प्रकारच्या अध्यापक विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती एकत्र येऊन ज्ञानाचे आदान प्रदान करीत असतात. याचा फायदा प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना होत असून त्यांना समकालीन अद्ययावत तंत्रज्ञानाची ओळख अशा प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून होत असल्याचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

या पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील विषयतज्ञांनी विविध सत्रांमध्ये उपस्थितांशी संवाद साधला. या पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये राज्यभरातून संबंधित विद्याशाखेचे विषयतज्ञ, संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि सर्व संबंधित सहभागी झाले होते.

## ९० घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी आदेश वाटप



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २३ फेब्रुवारी : पैठण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत मावसगव्हाण ता पैठण कार्यालयात महाआवास अभियानांतर्गत ग्रामीण गृहनिर्माण राज्य व्यवस्थापन कक्षातर्फे प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोनमध्ये निवड झालेल्या ९० लाभार्थ्यांना मंजुरी आदेश प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे.ग्रामपंचायत अधिकारी यांच्या हस्ते मंजूर प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी बाळकृष्ण गव्हाणे, सरपंच रुख्मनबाई विठ्ठल शिंदे, ग्राम.प.सदस्य प्रकाश जाधव, ज्ञाने श्र्वर तेजींकर,विजय केदारे,हसन शेख, उमाकांत जाधव कृष्णा तेजीनकर महेश शिरवत पदाधिकारी, सदस्य, आदी उपस्थित होते.

## दिल्ली येथे अखिल भारतीय साहित्य संमेलनात, प्रख्यात कवयित्री सुनिता कावसनकर यांच्या स्त्री भृण हत्या या कवितेने श्रोते झाले भावूक

नवी दिल्ली : ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या तिसर्या दिवशी सकाळी ९ वाजता सुरू झालेल्या कवीसंमेलनात, निमंत्रित असलेल्या छत्रपती संभाजीनगरच्या प्रख्यात कवयित्री सौ.सुनिता कावसनकर यांच्या स्त्री भृण हत्येवरील कवितेने सभागृहातील वातावरण अतिशय भावूक झाले..

आईच्या गर्भात असलेली छोटीशी कळी आर्त टाहो फोडून विनवणी करते कि, मला जन्म घेण्याआधीच मारु नका..

जन्माआधीच कळी कोवळी नका रे खुडू..<br>
आईच्या सुरक्षित गर्भात मज नका रे मारु..<br>
या ओळींनी रसिक श्रोते भावूक होऊन त्यांचे डोळे पाणावले..

निरागस कळी मी, जरी गर्भवासी<br>
भविष्याची स्वप्ने, ह्रदयी बीजकोशी,



मी आईच्या गर्भातली कोवळी निरागस कळी जरी असले, तरी माझ्या ह्रदयात, जन्म घेवून विधात्याने निर्मिलेली सुंदर सृष्टी बघण्याची व भविष्याची स्वप्ने आहेत.. मी यशाची पहाट आहे, तमाला दुर सारणारी प्रकाशमयी तेजोमयी वाट आहे.. मी जन्मदात्री आहे, मी सृष्टी घडवणारी अभिजात जननी आहे..मला जन्मू द्या हो, मला श्वास द्या असा आर्त टाहो जेंव्हा कवयित्री सुनिता यांच्या स्वरातून बाहेर पडला तेंव्हा रसिकांची मने हेलावली.. जगाला अतिशय सुंदर असा संदेश या कवितेतून त्यांनी दिला आहे. सुनिता दिपक कावसनकर, या कवयित्री, लेखिका, युगंधर साप्ताहिकाच्या संपादिका, युगंधरा साप्ताहिक,युगंधरा प्रकाशन संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा तसेच युगंधरा मराठी साहित्य व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या व्यवस्थापकीय संचालिका व संस्थापिका आहेत.

## पोरगाव कचनेर चौफुलीवर अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक, एक ठार



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २३ फेब्रुवारी दहेगावफाटा ते करमाड या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १२५ वर पोरगाव कचनेर चौफुलीवर दि २२ रोजी सायंकाळी सहा वाजेच्या दरम्यान एका अज्ञात वाहनाने दुचाकी क्रमांक एम एच २० बी पी ३५८७ दुचाकीस्वारास जोरदार धडक देत अज्ञात वाहनाच्या चाकाखाली चिरडले यात दुचाकी चालक योगेश गोरखनाथ पवार वय ३२ वर्षं रा पोरगाव तांडा,ता पैठण याचा जागीच मृत्यू झाला आहे,तर अज्ञात वाहन चालक वाहनांसह पसार झाला आहे, घटनास्थळी मृतदेह पडले असताना, चौफुलीवरील नागरिकांनी बिडकीन पोलीस ठाण्यात अपघाताची माहिती दिली या माहितीवरून बीट जमादार जगन्नाथ उबाळे घटनास्थळी जाऊन नातेवाईकांच्या मदतीने मृतदेह पुढील कार्यवाही साठी ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे आणण्यात आले असता वैद्यकीय अधिकारी डॉ आशिष वेदपाठक यांनी तपासून मृत्यू घोषित केले व शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आहे आले, पुढील तपास बीट जमादार जगन्नाथ उबाळे करीत आहे.

रोखठोक

# नवे महाभारत आणि 'चिनी ड्रोनाचार्य'!

**दिनेश गुणे**

कौरव आणि पांडव यांच्यातील न्यायाच्या लढाईचा निर्णायक क्षण समोर येऊन उभा ठाकलेला असताना, सभोवतीच्या सैन्याच्या महासागरात शत्रुपक्षाच्या बाजूने आपलेच आप्त, स्वकीय, ज्येष्ठ, गुरुजन आपल्याशी लढण्याकरिता सज्ज झाल्याचे पाहून धर्मक्षेत्र कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर अर्जुनाची अवस्था केविलवाणी झाली. त्याचे धैर्य गळून पडले. अवसानही गळाले, जिभेला कोरड पडली, शरीराला भयाने कंप सुटला आणि आपण या स्वकीयांशी लढू शकणार नाही अशी त्याची खात्री पटली. त्या वेळी त्याच्या रथाचे सारथ्य करण्यासाठी श्रीकृष्ण नसता, तर महाभारतातील त्या निर्णायक क्षणाचे पारडे फिरले असते. श्रीकृष्णाने अर्जुनास धीर दिला, सत्याचा विजय होण्यासाठी लढले पाहिजे, समोर उभा असलेला प्रत्येकजण या क्षणी शत्रू आहे, एवढेच वास्तव श्रीकृष्णाने अर्जुनाच्या मनावर बिंबविले आणि त्या रणभूमीवर अर्जुन लढाईसाठी सिद्ध झाला. आपल्याच जवळच्या माणसांसोबत युद्ध करणे कोणत्याही संवेदनशील माणसासाठी किती अवघड असते, आपली बाजू न्यायाची आहे, सत्याची आहे हे माहीत असूनही न्यायाकरिता लढणेदेखील सोपे नसते, हे त्या क्षणाच्या इतिहासाने जगाच्या मनावर कायमचे कोरले आहे. तरीही, महाभारताच्या त्या रणभूमीवरचे काही प्रश्न अजूनही समाधानकारकरीत्या उकलले गेलेले नसावेत. पांडवांची बाजू न्यायाची आहे, धर्माची आहे, त्यामुळे या युद्धात त्यांचा विजय निश्चित आहे, हे माहीत असूनही भीष्म, द्रोणाचार्य आणि अन्य अनेक ज्येष्ठांनी कौरवांच्या बाजूने पांडवांशी युद्ध करण्याचा निर्णय का घेतला असावा, त्यांची त्या काळी अशी कोणती अपरिहार्यता असावी, याचे स्पष्ट उत्तर शोधावे लागते. या युद्धाच्या काळात एका क्षणी पांडवांचा ज्येष्ठ बंधू धर्मराज हादेखील वैफल्यग्रस्त झाला. आपल्याच आप्तांशी लढून राज्य मिळविण्यात आपल्याला कोणताही आनंद मिळणार नाही, असे त्याचे उद्विग्न मन त्याला सांगू लागले, तेव्हा त्याला समजावण्यासाठी अर्जुन पुढे आला. त्याआधी, या युद्धास प्रारंभ होण्याअगोदर श्रीकृष्णाने त्याला लढण्यासाठी प्रवृत्त केले होते. रणी का लढले पाहिजे, हे स्पष्ट केले होते आणि सत्याचा विजय हाच अंतिम विजय असतो, हेदेखील अर्जुनास समजावून सांगितले होते. श्रीकृष्णाच्या या शिकवणुकीने प्रेरित झालेल्या अर्जुनाने धर्मराजाची वैफल्यावस्था ओळखून हाच मंत्र त्याला सांगितला. आपले सारे आप्त, स्वकीय, गुरुजन आपल्या शत्रूच्या बाजूने आपल्याशी युद्ध करण्यास सज्ज असले, तरी साक्षात श्रीकृष्ण आपल्यासोबत आहे, हे अर्जुनाने युधिष्ठिरास सांगितले. जेथे श्रीकृष्ण आहे, तेथे धर्म आहे आणि जेथे धर्म आहे, तेथे विजय निश्चित आहे - यतो कृष्णः ततो धर्मः, यतो धर्मस्ततो जयः - अशा शब्दांत अर्जुनाने युधिष्ठिरास युद्धप्रवृत्त केले आणि धर्माच्या, सत्याच्या विजयासाठी कटिबद्ध होऊन पांडवांनी कौरवांशी निकराचा लढा देऊन त्यांना पराभूत केले. धर्माचा विजय झाला, सत्याचा विजय झाला. भीष्म, द्रोणाचार्य आदी ज्येष्ठांनाही हे माहीत होते. या युद्धात पांडवांची बाजू ही न्यायाची बाजू आहे आणि न्यायाच्या बाजूचा अंतिमतः विजय होतो, धर्माचा विजय होतो, हे माहीत असूनही ते कौरवांच्या बाजूने लढले व न्यायाचा विजय व्हावा यासाठी धरातीर्थी पडले. जेथे धर्म आहे, तेथे विजय आहे, ही महाभारताची शिकवण आहे. या महाकाव्यात याचा सातत्याने पुनरुच्चार झालेला आढळतो. म्हणूनच, आपल्या न्यायव्यवस्थेनेही ही शिकवण ध्येयवाक्य म्हणून स्वीकारली आणि न्यायाचा, धर्माचा विजय व्हावा यासाठी न्यायव्यवस्था सतर्क राहिली.

महाभारतातील या कथानकाचा वर्तमानाशी असा धागा जुळलेला आहे. त्याहूनही अधिक म्हणजे, अशी अनेक साम्यस्थळे सध्याच्या काळात राजकारणाच्या संघर्षभूमीवर पाहावयास मिळतात आणि न्यायाचा विजय होणार हे माहीत असूनही, न्यायाच्या, धर्माच्या बाजूविरोधात लढण्यासाठी काहीजण सहजपणे शत्रूची भलामण करतात, तेव्हा याच कथानकाची आठवण होते. ज्यांनी पांडवांना युद्धशास्त्र शिकविले, शस्त्रे चालविण्याचे ज्ञान दिले, त्या द्रोणाचार्यांशीच युद्ध करण्याची वेळ पांडवांवर आली, द्रोणाचार्यांनी दिलेले ज्ञान वापरूनच पांडवांनी त्यांच्यावरही शस्त्रे चालविली. सत्याचा विजय होतो, हे माहीत असूनही द्रोणाचार्य शत्रूच्या बाजूने युद्धभूमीवरचा किल्ला लढवत होते, हेच त्याचे कारण होते. आजही, राजकारणात अशी काही साम्यस्थळे आढळतात, तेव्हा त्याची संगती लावणे अवघड होते.

सत्ताधाऱ्यांच्या, राज्यकर्त्यांच्या विरोधात बोलणे म्हणजे राष्ट्रद्रोह नव्हे, हे खरे आहे. पण सत्ताधाऱ्यांनी घेतलेल्या कोणत्याही देशहिताच्या विरोधात बोलून थेट किंवा अप्रत्यक्षपणे शत्रूचे हित सांभाळण्याच्या कृतीला काय म्हणावे असा प्रश्न पडण्यासारखी स्थिती अलिकडच्या राजकारणात वारंवार पाहावयास मिळते. आजच्या कुरुक्षेत्राचे रूप वेगळे आहे. राजकारण ही युद्धाची रणभूमी आहे आणि सत्ताधारी व विरोधक यांच्यातील संघर्षाचे महाभारत ठायीठायी या रणभूमीवर पाहावयास मिळते. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संघर्ष ही काही अनपेक्षित, अनाकलनीय बाब नाही. उलट, सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी विरोधकांनी आपली शस्त्रे सतत परजलेली असलीच पाहिजेत, असे लोकशाहीचे संकेतच आहेत. मात्र, विरोधकांचा विरोधही विधायक हवा, अशी लोकशाहीची अपेक्षा असते. ज्यामुळे देशहिताला बाधा येईल, अशी भूमिका घेऊन सत्ताधाऱ्यांची कोंडी करणे या व्यवस्थेस मान्यच नाही. म्हणूनच, शत्रुपक्षीय हितसंबंध जपले जातील अशी भूमिका घेत कोणी एखादा विरोधक जेव्हा सत्ताधाऱ्यांशी संघर्षाचा पवित्रा घेतो, तेव्हा राजकारणाच्या भुवया उंचावतात. अलिकडच्या काही घडामोडींतून तसेच काहीसे दिसू लागले. काँग्रेसचे सर्वेसर्वा नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची राजकीय भूमिका, राष्ट्रासंबंधीची काही मते अनेकदा वादग्रस्त ठरलेली



आहेत. भारत हा राज्यांचा समूह आहे, ही त्यांनी देशातच नव्हे, तर विदेशाच्या भूमीवर जाऊन मांडलेली भूमिका देशाच्या अखंडत्वालाच आव्हान देणारी ठरली, तेव्हा राजकारणाच्या रणभूमीवर असेच वादळ माजले. अशा भूमिका केवळ सत्ताधाऱ्यांच्या विरोधासाठी मांडल्या जात असल्या तरी त्यातून देशाचे हितसंबंध पणाला लागत असल्याने राहुल गांधींच्या या भूमिकेस प्रखर विरोध झाला. याच राहुल गांधींनी अलिकडेच केलेल्या एका वक्तव्यामुळे, महाभारतातील युद्धभूमीवर कौरवांच्या बाजूने लढणाऱ्या द्रोणाचार्यांची आठवण होणे साहजिक होते. आजच्या राजकारणाच्या रणभूमीवर राहुल गांधींनी ड्रोनच्या मुद्द्यावरून शत्रूच्या बाजूने किल्ला लढवत सत्ताधाऱ्यांना धारेवर धरण्याचा प्रयत्न केला. महाभारत काळात द्रोणाचार्यांच्या भूमिकेमुळे पांडव संभ्रमात पडले होते, आता राहुल गांधींनी घेतलेल्या चिनी ड्रोनसंबंधीच्या भूमिकेमुळे देश संभ्रमात पडला आहे. सत्ताधाऱ्यांना विरोध करताना राहुल गांधी अप्रत्यक्षपणे चीनसारख्या देशाची भलामण करत नाहीत ना, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे. भारताच्या ड्रोन निर्मिती उद्योगासंबंधी वक्तव्य करताना राहुल गांधी यांनी चिनी बनावटीचे एक ड्रोन उडवून दाखविले. या ड्रोनच्या वापरास भारतात बंदी असताना राहुल गांधी यांनी केलेल्या या कृतीवर अर्थातच देशात आणि राजकीय क्षेत्रात खळबळ माजली. भारतातील ड्रोन निर्मिती क्षेत्र तंत्रज्ञानाच्या बाबतीत चीनपेक्षा कितीतरी मागे आहे, असा दावा करून चीनची भलामण करत देशातील उद्योग व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील मागासलेपणावर बोट ठेवण्याचा राहुल गांधी यांचा प्रयत्न म्हणजे महाभारताच्या युद्धभूमीवर न्यायाच्या विरोधात लढणाऱ्या पांडवांच्या आप्तांच्या भूमिकेशी मिळताजुळताच असल्याने, या युद्धभूमीवर नवे महाभारत सुरू झाले आहे. प्रत्यक्षात ड्रोन निर्मिती क्षेत्रातील भारताचे तंत्रज्ञान आणि प्रगतीचे वास्तव राहुल गांधी सांगतात तसे नाही. ड्रोन निर्मिती क्षेत्रात तंत्रज्ञानाची भरारी मारण्यासाठी आणि चीनच्या ड्रोन उद्योगाशी स्पर्धा करण्यासाठी देशातील ४०० हून अधिक संस्था व त्यांच्याशी संलग्न असलेल्या सुमारे ५० घटक संस्था कठोर परिश्रम करत असताना त्यांच्या श्रमाचा अपमान करून चीनची भलामण करण्यामागे राहुल गांधी यांचा नेमका कोणता उद्देश असावा, असा प्रश्न लगेचच उपस्थित झाला. एक तर, बंदी असलेले चिनी बनावटीचे ड्रोन भारताच्या भूमीवर उडवून राहुल गांधी यांनी देशाच्या भूमिकेस आव्हान दिले आणि दुसरीकडे भारतीय उद्योग व तंत्रज्ञानाच्या प्रगतीवर प्रश्नचिन्हे उमटवून चीनच्या प्रगतीचे पोवाडे गाऊन दाखविले. लोकशाहीस अपेक्षित असलेली राजकीय विरोधाची त्यांची भूमिका येथे देशहितास आव्हान देणारी ठरत नाही का, असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला. राहुल गांधी हे आता केवळ काँग्रेसच्या नेहरू, गांधी घराण्याच्या परंपरेनुसार काँग्रेसचे सर्वेसर्वा नेते नाहीत, तर ते लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. त्यांच्या कृती आणि उक्तीचे अनुसरण समाजातील एक वर्ग करत असतो. त्यामुळे ड्रोन निर्मिती क्षेत्रात भारताकडे काहीच नाही, ही चिनी बनावटीच्या ड्रोनच्या स्पर्धेत भारत अजून मागासलेलाच आहे, अशी विधाने करून त्यांनी या वर्गातील संभ्रम माजविल्याची भावना व्यक्त होऊ लागली. वैधानिक जबाबदारीच्या पदावरून बोलताना विरोधाच्या भूमिकेसही काही वैचारिक बैठक असावयास हवी, अशी अपेक्षा व्यक्त होऊ लागली. कोणीही एखादा नेता सत्ताधाऱ्यांना विरोध करण्यासाठी उठतो आणि या उद्योगाचा मुखभंग करून चीनची स्तुतिस्तोत्रे गाऊन दाखवितो, यामुळे या उद्योगात निराशा दाटू लागली. यामुळेच, ड्रोन फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष स्मित शहा यांनी राहुल गांधी यांच्या वक्तव्याविषयी लगेचच तीव्र नाराजी नोंदविली. ज्या ड्रोनच्या वापरास भारताच्या भूमीवर बंदी आहे, असे चिनी बनावटीचे ड्रोन उडवून भारताच्या ड्रोन उद्योगाची खिल्ली उडविणे अतिशय निराशाजनक आणि अनाकलनीय आहे, अशा शब्दांत शहा यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या.

राहुल गांधी यांचे ड्रोनबाबतचे हे वक्तव्य केवळ चीनचे स्तुतिगान नसून भारताच्या आत्मनिर्भरतेच्या, स्वयंपूर्णतेच्या, तंत्रज्ञानाच्या आणि प्रगतीच्या वाटचालीवर उमटविलेले प्रश्नचिन्ह ठरले आहे. एकीकडे भारतीय तंत्रज्ञानाची भरारी चंद्रापर्यंत पोहोचली आहे, संरक्षण क्षेत्रात भारताने घडविलेल्या प्रगतीमुळे जगाचे डोळे विस्फारले आहेत आणि दुसरीकडे राहुल गांधी यांच्यासारखा विरोधी पक्षनेतेपदाची वैधानिक जबाबदारी असलेला नेता मात्र, या प्रगतीचे पंख कापण्यासाठी शाब्दिक शस्त्रे चालवत चीनची स्तुती करत आहे, हे चित्र खेदजनक आहे. ड्रोन तंत्रज्ञान आणि त्याची आजच्या युगाची गरज ओळखून केंद्र सरकारने चार वर्षांपूर्वी, २०२१ मध्येच या उद्योगास प्रोत्साहन देणारे धोरण आखले. त्यानंतर आज भारताने या क्षेत्रात साधलेल्या प्रगतीचे पंख विदेशांतही पोहोचले आहेत. भारतीय बनावटीचे ड्रोन केवळ भारतातच नव्हे, तर परदेशांतही निर्यात होऊ लागले असताना राहुल गांधी यांनी केलेले वक्तव्य केवळ अज्ञानापोटी होते, की चिनी ड्रोनच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी होते, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. भारतातील ड्रोन निर्मिती उद्योग आणि त्याच्या घटक कंपन्यांतून बॅटरी, प्रोपेलर, फ्लाईट कंट्रोलर, ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाईट यंत्रणा, असे अनेक भाग स्वतंत्रपणे तयार होत असून त्यांचा दर्जाही जागतिक स्तरावरील स्पर्धात्मक उत्पादनांएवढा श्रेष्ठ आहे. या उद्योगाची उलाढाल तीन हजार कोटींच्या घरात पोहोचली आहे. अशा परिस्थितीत, भारतातील ड्रोन उद्योगाकडे कमकुवत म्हणून पाहणे, दर्जा नाही असा दावा करण्यामागच्या राहुल गांधी यांच्या मानसिकतेचे विश्लेषण व्हायला हवे. राहुल गांधी यांनी स्वदेशी तंत्रज्ञानास पाठिंबा देण्याऐवजी चीनच्या उत्पादनाची प्रशंसा का केली, ते चिनी उत्पादनाच्या वापरास प्रोत्साहन देत आहेत का, असे काही प्रश्नही या निमित्ताने निर्माण झाले आहेत. मुख्य म्हणजे, ज्या ड्रोनची त्यांनी प्रशंसाच नव्हे, तर प्रात्यक्षिकही करून दाखविले, त्या ड्रोनवर भारतात २००२ पासून निर्बंध असताना, हा ड्रोन राहुल गांधी यांच्याकडे कोठून आला, असाही प्रश्न विचारला जात आहे. ड्रोन चालविण्यासाठी रिमोट पायलट दाखला, परवान्याची गरज असते. दिल्लीच्या परिसरात ड्रोन चालविण्यास मनाई असताना, निषिद्ध क्षेत्रात हे प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी राहुल गांधी यांच्याकडे तसा परवाना आहे का, असा प्रश्नही उपस्थित झाला आहे. चिनी बनावटीच्या याच ड्रोनचा वापर युक्रेन युद्धात झाला असून अनेक निरपराध नागरिकांच्या मृत्यूशी त्याचा संबंध असल्याची शंकाही उपस्थित केली जात असल्याने, राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दाही यातून समोर आला असल्याचा आक्षेपही घेतला जात आहे. राहुल गांधी यांचे सल्लागार सॅम पित्रोदा यांनी तर या संदर्भात राहुल गांधी यांची येथे पाठराखण करून काँग्रेसचीदेखील हीच भूमिका असल्याचे संकेत दिल्याचे मानले जाते. त्यामुळे, गांधी कुटुंबाची चीनसोबतची जवळीक हा मुद्दा आता प्रामुख्याने अधोरेखित होऊ लागला आहे. या कुटुंबाने २००८ मध्ये चीनच्या कम्युनिस्ट पक्षासोबत गुप्त करार केल्याची चर्चा आहे. या कराराचा तपशील जाहीर झालेला नाही. महाभारताच्या युद्धप्रसंगी कौरवांच्या बाजूने लढणारे द्रोण आणि सध्याच्या राजकीय युद्धात चीनच्या ड्रोनची स्तुतिस्तोत्रे गाणारे राहुल गांधी हे आधुनिक काळातील ड्रोनाचार्य ठरणार आहेत. भारताच्या प्रगतीवर प्रश्नचिन्हे उमटवून चीनच्या उत्पादनाची जाहिरात करणारे राहुल गांधी हे चीनचे ब्रॅण्ड अॅम्बेसेडर आहेत का, असा खोचक सवाल काही नेत्यांनी केला आहे. राहुल गांधी यांच्या भूमिकांमुळे देशासमोरील कोणते प्रश्न सुटले किंवा कोणत्या भूमिकांमुळे कोणते प्रश्न वादग्रस्त ठरले, याचा लेखाजोखा मांडला जायला हवा!

dineshgune@gmail.com

---

## रविवारची पत्रे

### प्रत्येकाच्या मनामनातला छावा!

काय आहे हे छावा... का बोलतेय मी छाव्याबद्दल अचानक... छावा म्हणजे सिंहाचे पिल्लू हे तर सगळ्यांनाच ठावूक आहे... पण आज किंवा अनेक वर्षांपूर्वी छावा या शब्दाला एक विशेषण मिळाले. विशेषण का बरं बोललं असेल मी... कारण ती व्यक्तीही तशीच आहे विशेष... सिंहास रखी... सारखी काय.. सिंहच जणू... दहा हत्तीचे बळ घेऊन जन्मलेली... कोण आहे छावा!! श्री छत्रपती संभाजी महाराज.

आपणा सर्वांना छत्रपती शिवाजी महाराज माहीत आहेत.



छत्रपती संभाजी महाराजांनासुद्धा ओळखतो... पण काही लोक खासकरून तरुण पिढी तर त्यांना फक्त नावानीच ओळखत किंवा काही तर नावानीसुद्धा ओळखत नसत... मी स्वतः १९ वर्षांची आहे. कोण्या मित्र-मैत्रिणीला विचारले तर कोण ग संभाजी महाराज माहितीये का? तर उत्तर मिळतं हो हो माहिती आहे ना शिवाजी महाराज यांचे पुत्र. मग विचारले की काय सांगू शकते तू त्यांच्या बद्दल? तर झाला डब्बा गुल!

सध्याच्या शिक्षणपद्धतीतही आपला इतिहास न सांगता परदेशाचा इतिहास मोठ्या गौरवाने टाकला गेलेला आहे. असो! पण सिनेमाची क्रेझ तशी तरुण पिढीला फारच आहे. त्यामुळे लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित छावा हा सिनेमा तरुण पिढीसाठी स्वतःच्या मातृभूमीचा इतिहास जाणून घेण्यासाठी उत्तम अशी एक संधी आहे... अभिनेते विकी कौशल व अभिनेत्री रश्मिका मंधाना यांची उत्तम कारकीर्द सतत पाहत रहावीशी वाटते... श्री संभाजी महाराजांच्या डोळ्यात जशी काही स्वराज्याची ज्वाला भडकत असेल तशी ज्वाला पाहून गर्व वाटू लागतो आणि सोबतच अंगावर न कळत काटा येऊ लागतो. अभिनेते अक्षय खन्ना यांनी साकारलेल्या औरंगजेबाला पाहून जणू खरंच त्याला पडद्याच्या आत जाऊन मारून यावं असं वाटू लागतं. महाराजांची शूरता, वीरता व कौशल्यपूर्ण युद्धनीती किती अफाट आहे याची कल्पना येऊन छाती चौडी होऊन जाते. हिंदी सिनेसृष्टीतील हा पहिलाच असा सिनेमा असावा ज्याने जवळपास सगळ्याच गोष्टी न कापता दाखवल्या असतील. महाराजांनी सोसलेले जुलूम पाहून एकही प्रेक्षक असा नसतो ज्याच्या डोळ्यातून अश्रू झळकत नसतील. आपोआप संपूर्ण चित्रपटगृहात मौन पसरून जातं. चीड येऊन जाते ती बगावतीची दृश्ये पाहून. काय हा स्वार्थीपणा, आपल्याच लोकांचा बळी घेतो बळी काय खून करतो.

माझ्या वयोगटातील मुलं-मुली आजकाल कोरियन सिनेमा, कार्टून्स त्यांच्या भाषेत म्हणावं तर ऐनेमे यातील पात्रांना त्यांचे आदर्श मानू लागले आहेत. यात गैर असे काही नाही. मी त्याच्या विरोधात आहे, परंतु जेव्हा आपल्या राज्यात किंवा देशात असा एक महान पुरुष होऊन गेला आहे ज्याने तोंडातून एकही अक्षर न काढता नखे काढणे, डोळ्यात गरम सळई घालणे, तलवार, कट्यार, चाबूक यांनी झालेल्या जखमेवर मीठ चोळणे अशासारखे दुःख हसत हसत देव, देश आणि धर्मासाठी बलिदान दिले व औरंगजेबाला मात दिली अशा वीरांना आपण आपले आदर्श मानले तर भारत हा किती छान देश होईल हे मला सांगण्याची गरज नाही.

छावा ही एक अत्यंत सुरेख अशी जीवित छवी आहे छत्रपती संभाजी महाराजांची. सगळ्यांनी एकदा तरी हा सिनेमा पाहावा.

**मृदुला महेश दलाल**/ ७२१८३७७५५६

***

### राष्ट्रीय विज्ञान दिवस

आपल्या देशामध्ये १९८७ पासून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो. १९८७ साली प्रसिद्ध शास्त्रज्ञ वसंतराव गोवारीकर भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्याचे सचिव होते. त्यांनी भारतभर एक वैज्ञानिक वातावरण तयार व्हावे यासाठी हा दिवस विज्ञान दिवस म्हणून साजरा व्हावा यासाठी प्रयत्न केले.

२८ फेब्रुवारी १९२८ या दिवशी डॉ. सी. व्ही. रमण यांनी आपला शोधनिबंध 'रमण परिणाम' जगप्रसिद्ध 'नेचर' या विज्ञान मासिकाकडे छापण्यासाठी पाठवला होता. पुढे त्यांना १९३० साली भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले. राष्ट्रीय विज्ञान दिवस २८ फेब्रुवारी हा दिवस या घटनेच्या स्मरणार्थ ठरविण्यात आला आहे.

रमण परिणाम सांगतो की जेव्हा द्रवातून प्रकाश तरंग बाहेर येतो तेव्हा या प्रकाश लहरीचा एक भाग अशा दिशेने वितरित केला जातो जो येणाऱ्या प्रकाश लहरीच्या दिशेपेक्षा वेगळा असतो. या विखुरलेल्या प्रकाशाचा बहुतांश भाग अपरिवर्तित तरंगलांबीचा असतो. डॉ. सी. व्ही. रमण यांचे हे संशोधन अशा प्रकारे समुद्राचे पाणी निळे का दिसते यासारख्या काही घटना स्पष्ट करते. रमण इफेक्ट हा फोटॉन कणांच्या लवचीक वितरणाविषयी आहे.

डॉ. सी. व्ही. रमण यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी ब्रिटिश भारतातील तत्कालीन मद्रास प्रेसिडेन्सी येथे झाला. त्यांचे वडील भौतिकशास्त्र आणि गणिताचे प्राध्यापक होते. डॉ. सी. व्ही. रमण यांनी अनेक विज्ञान स्पर्धांमध्ये भाग घेतला, त्यानंतर भारत सरकारच्या वित्त विभागाने त्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड केली. त्यांनी मद्रासच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून बीए पूर्ण केले आणि त्याच संस्थेतून भौतिकशास्त्रात एम. ए. केले. त्यांनी कलकत्ता विद्यापीठ आणि इंडियन असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्सच्या प्रयोगशाळांमध्ये संशोधन केले. भारत सरकारने त्यांना १९५४ मध्ये भारतरत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला.

राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा होऊ लागल्यापासून त्या दिनाच्या निमित्ताने अनेक प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. देशभर विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रसार करणाऱ्या संस्थांच्या व्यक्तींना विज्ञान पुरस्कार या निमित्ताने दिला जातो. विज्ञान प्रदर्शन व व्याख्याने आयोजित केल्या जातात. रेडिओद्वारा सोप्या भाषेत विज्ञान लोकांपर्यंत पोहचविले जाते. दूरदर्शनवरील विविध वाहिन्यांच्या माध्यमातून विज्ञान विषयक कार्यक्रम प्रसारित केले जातात. विज्ञानावरील पुस्तके छापून प्रकाशित केल्या जातात. निबंध स्पर्धा, भित्तिचित्र स्पर्धा, वादविवाद स्पर्धा इत्यादी कार्यक्रमांची रेलचेल असते. या दिवशी सर्व शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांत विविध स्पर्धांचे आयोजन करून विज्ञान विषयक वातावरण निर्माण केले जाते.

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या दिवशी विविध प्रकारच्या विज्ञान संस्था सर्वांना पाहण्यासाठी खुल्या असतात. त्या ठिकाणी नागरिकांनी आपल्या शालेय विद्यार्थ्यांना अवश्य घेऊन जावे. त्यामुळे विविध प्रकारचे विज्ञानविषयक संशोधन कार्य कसे चालते, याबाबत माहिती विद्यार्थ्यांना मिळते. विज्ञान हे आधुनिक युगातील फार मोठे आणि महत्त्वाचे साधन आहे. विज्ञानाने माणसाच्या आयुष्यामध्ये फार मोठी क्रांती घडवून आणली आहे. विज्ञान रोजच्या समस्यांवर उपाय शोधून काढते आणि विश्वाच्या महान रहस्यांची उत्तरे देते. त्यामुळे विज्ञान हे ज्ञानाचे सर्वांत महत्त्वाचे माध्यम आहे. त्याची एक विशिष्ट भूमिका आहे. तरीही आपल्या समाजाच्या फायद्यासाठी, ज्ञान आणि शिक्षण सुधारण्यासाठी आणि जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी विविध कार्ये केली जातात. समस्यांकडे बघण्याचा नवीन दृष्टिकोन शोधणाऱ्या आणि नवीन वैज्ञानिक कायदे सिद्ध करणाऱ्या वैज्ञानिकांमुळे एखादा देश विकसित होऊ शकतो. या संदर्भात आदरणीय भौतिकशास्त्रज्ञ डॉ. चंद्रशेखर व्यंकट रमण यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो.

**डॉ. मदन काकडे**/ ९३७३११२४८७

***

### कलियुग व नामस्मरण

पुराणानुसार हिंदू धर्मात चार युगे सांगितली आहेत. कृतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलियुग. कलियुगात धर्म एकपाद असल्याने त्यांची गती कमी असेल मात्र अधर्माला चार पाय असतील म्हणून तो जोरात धावेल म्हणजे कलियुगात लोकांची प्रवृत्ती अधर्माकडे जास्त असेल तसेच पुण्यापेक्षा पाप प्रबळ असेल.

द्वापारयुग संपून कलियुग येणार या जाणिवेने अस्वस्थ झालेल्या पांडवांनी श्रीकृष्णाला याबाबत विचारणा केली. पाच पांडवापैकी अर्जुन, भीम, नकुल व सहदेव यांनी कलियुग हे कसे असेल? असा प्रश्न श्रीकृष्णाला केला. तेव्हा भगवान श्रीकृष्णाने चारही जणांना चार दिशेने जावयास सांगितले व कोणतीही विचित्र घटना तुम्हाला दिसल्यास ते मला येऊन सांगा असे म्हटले. त्याप्रमाणे चार जण चार दिशांना गेले व परत येऊन त्यांनी प्रत्येकाने आपण पाहिलेली विचित्र गोष्ट भगवान श्रीकृष्णाला कथन केली.

अर्जुन म्हणाला, त्याला एका ठिकाणी एक विचित्र दृश्य दिसले. एका पक्ष्याच्या पंखावर वेद लिहिलेले आहेत. मात्र तो पक्षी सशाचे मांस भक्षण करीत असलेला दिसला. तेव्हा कृष्णाने अर्जुनाला सांगितले कलियुगात देवाबद्दल ज्ञान असणारे व देणारे अनेक असतील परंतु ते साधकाचे शोषण करतील.

भीम म्हणाला वाटेत एके ठिकाणी मला एका विहिरीभोवती चार विहिरी अशा पाच विहिरी दिसल्या. चार बाजूच्या विहिरींमध्ये भरपूर गोडे पाणी असून मधली विहीर मात्र कोरडी ठण्ण होती. भिमाच्या विहिरीच्या उदाहरणावरून भगवान म्हणाले, कलियुगात श्रीमंताकडे भरपूर धन असेल. चार विहिरींतील पाण्याप्रमाणे मात्र गरिबाला ते त्यातील काहीही देणार नाहीत, तो गरीब, गरीबच राहील मधल्या कोरड्या विहिरीप्रमाणे.

नकुलला त्याच्या मार्गात एक गाय आपल्या नवजात शिशूला जिभेने चाटून चाटून साफ करीत असलेली दिसली. पण साफ झाल्यावरही तिचे चाटणे सुरूच होते. मात्र तिच्या चाटण्याने त्या शिशूला जखमा होऊ लागल्या होत्या तरी तिचे चाटणे सुटत नव्हते. गायीच्या चाटण्याबद्दल श्रीकृष्ण म्हणाले, कलियुगात स्त्रिया आपल्या अपत्यावर इतके प्रेम करतील की त्या प्रेमापोटी मुले अकार्यक्षम होऊन लाडाने वाया जातील.

शेवटी सहदेव म्हणाला, मला एक मोठी शिळा, मोठ्या पहाडावरून पडत असून ती मार्गातील मोठ मोठ्या वृक्षांना मुळापासून उखडून टाकीत असलेली दिसली मात्र खाली येत असलेला हा खडक एका लहान झुडपाजवळ येऊन थांबला. हे बघून मला अतिशय आश्चर्य वाटले. शिळेच्या उदाहरणावरून श्रीकृष्ण म्हणाले, कलियुगात मनुष्य चारित्र्याबाबत खडकाप्रमाणे घसरत अत्यंत नीच पातळीवर जाईल. मात्र भगवंताचे अल्प नामस्मरणही (लहान झुडपात सारखे) त्याला अधोगतीपासून वाचवू शकेल, रोखू शकेल. कृतयुगात यज्ञ केल्याने जे फळ मिळत होते ते कलियुगात केवळ नामस्मरण केल्याने प्राप्त होईल.

तात्पर्य : कलियुगात दंभाचार, ढोंगीपणा, स्वार्थीपणा, चरित्रहीनता, अधर्म वाढीस लागेल व त्यामुळे मनुष्य पापाच्या खोल गर्तेत पडत जाईल. मात्र भगवंताचे अल्प नामस्मरणही त्याला या सर्व अधोगतीपासून थांबवेल व तारून नेईल.

**भालचंद्र ठोंबरे**/ ९८३४३५०८९५

***

### भगवंत सर्व दोषाला क्षमा करतात; परंतु अहंकाराला नाही

आज समाजमनात मोह, माया, मत्सर, द्वेष व अहंकार यांनी अधिष्ठान मांडलेले आहे. या पांच विकारांच्या आहारी माणूस गेलेला आहे. यामुळे व्यक्ती जीवन खूप अस्थिर आहे, दुःखी व असमाधानी आहे. कुणीही कुणाचे ऐकण्याच्या मनःस्थितीत नाही. या पाच विकारातील अहंकार हा पराकोटीला पोहोचला आहे. भगवंत भक्तांच्या सर्व दोषांना क्षमा करतात मात्र पुरुषी अहंकाराला कदापिही क्षमा करीत नाही.

अहंकार व अभिमान बाळगल्याने भगवंतांची उपेक्षा होत असते. आपल्या श्वासावरही आपली सत्ता नाही. व्यक्तीच्या जीवनात अभिमान-अहंकार बाळगण्यासारखे काहीच नसेल तर अभिमान का करावा? भक्ती, स्नेह, आपुलकी, प्रेम यासाठी अभिमान त्यागणे हीच सर्वांत मोठी कृती आहे. अभिमान व अहंकार बाळगल्याने व्यक्ती दुरावतात. या दुरावलेल्या व्यक्ती पुन्हा जवळ येत नाही आणि अहंकार बाळगणारी व्यक्ती एकाकी पडते. अशा अहंकारी व्यक्तीच्या जीवनात पदोपदी दुःख, असमाधान, अस्थिरता कायमची असते व याच बाबी व्यक्तीच्या अस्तित्वहीनतेला कारणीभूत ठरतात.

वारकरी संप्रदायातील वारकरी एकदुसऱ्यांना भेटल्यावर एकमेकांच्या पाया पडतात. याचे मर्म काय? तर स्वतःचा अभिमान व अहंकार बाजूला ठेवून एक दुसऱ्याबाबत आपुलकी, स्नेह, आत्मीयता बाळगणे होय.

संत सांगतात

'पंढरीच्या लोकां नाही अभिमान

पाया पडे जन एकमेका'

या उक्तीप्रमाणे या भूतलावरील सर्व मानव जातीने आपले सर्व विकार बाजूला ठेवावेत. खास करून अहंकारला मूठमाती द्यावी व सामाजिक दायित्व जपून समाजमनांशी एकरूप व्हावे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/ ९४२१३१२२४४

***

### सत्तारूढांच्या हाती आयते कोलित

लोकसभेतील काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती दिनी शुभेच्छा देत असताना, शिवरायांना श्रद्धांजली अर्पण करणारं ट्विट केलं. यावरून मोठा राजकीय गदारोळ उडाला आहे. यावरून सत्तारूढ पक्षाच्या तसेच इतरांच्या वतीने राहुल गांधी यांच्यावर चौफेर टीका, टिप्पणी होत आहे. सामान्यतः आपल्याकडे जयंतीदिनी आपल्यापेक्षा मोठी व्यक्ती तिच्याबद्दल आपल्या मनात असलेला भाव प्रकट करतो म्हणजेच आदरांजली किंवा अभिवादन करतो. काल परवा राहुल गांधींनी लडाख सेक्टरमध्ये घुसखोरी झाल्याचे लष्कर प्रमुखांनी म्हटल्याचे सांगून नरेंद्र मोदी सरकार काही लपवत असल्याचे सूचित केले होते. आता त्यावर लष्कर प्रमुखांनी देशाच्या लष्कराला राजकारणात ओढू नये असे झाल्यास चिंतेचा विषय असेल असा सल्ला राहुल गांधींना दिला आहे. या दोन गोष्टींवरून राहुल गांधी कोणतीही गोष्ट किती गांभीर्याने घेतात, बोलतात, वागतात हे दिसते.

कोणताही नेता परिपूर्ण नसतो. परंतु प्रत्येक व्यक्तिमत्त्व किंवा व्यक्तिमत्त्वातील दोष त्यांच्या सुज्ञ निर्णय घेण्याच्या आणि त्यांच्या भूमिकेच्या मागण्या पूर्ण करण्याच्या क्षमतेत अडथळा आणतो. म्हणूनच, एक सुज्ञ नेता तो असतो ज्याला त्याच्या वैयक्तिक कमतरतांबद्दल खोल आणि अचूक अंतर्दृष्टी असते आणि त्या प्रवृत्ती कमी करण्यासाठी त्याच्याकडे धोरणे असतात. राहुल गांधी यांच्याकडे त्यांच्या वैयक्तिक कमतरतांबद्दल खोल आणि अचूक अंतर्दृष्टी तर नाहीच आणि त्याप्रवृत्ती कमी करण्यासाठी जी दृढ इच्छा शक्ती लागते ती पण नाही.

खरं म्हटले तर राहुल गांधी हे आज 'पार्ट टाइम' राजकारणी आहेत. त्यांना धड देशासमोरच्या प्रश्नांची जाण आहे ना देशाचा इतिहास त्यांना माहीत आहे. पण राहुल गांधी ओव्हर स्मार्ट वागून सत्तारूढांच्या हातात सातत्याने मात्र आयते कोलित देत असतात व त्याद्वारे आपले हसे सुद्धा करून घेतात.

**अविनाश देशपांडे**/ ९२८४६७९६२३

***

### रेल्वे अपघात आणि उपाययोजना

काही दिवसांपूर्वी दिल्लीच्या रेल्वे स्टेशनवर चेंगराचेंगरीत काही लोकांचा दुर्दैवी अंत झाला. त्यामुळे गर्दी आवरण्यासाठी काहीतरी प्रयत्न केले जाणे क्रमप्राप्त होते. परंतु त्यानंतरही काहीच तासांत परत दुसऱ्या गाडीसाठी फलाटावर प्रचंड गर्दी झाल्याचा फोटो वृत्तपत्रात छापून आला होता. म्हणजे धोकादायक परिस्थिती उद्भवू नये म्हणून कुठलीही खबरदारी मधल्या काळात घेतली गेल्याचे सकृद्दर्शनी वाटत नाही. मागे काँग्रेस नेते शशी थरूर यांनी विमानातील इकॉनॉमी क्लासचा उल्लेख 'कॅटल क्लास' असा केला होता व त्यानंतर बराच गदारोळ झाला होता. मग रेल्वेच्या अनारक्षित श्रेणीत जी परिस्थिती असते तिला काय म्हणायचे? दुर्दैवाने तिथे हे वर्णन तंतोतंत लागू होते. पण ही परिस्थिती बदलण्यासाठी त्याबाबत साधी चर्चादेखील होताना दिसत नाही.

गाडीत असलेल्या डब्यांच्या अधिकतम क्षमतेचा विचार तिकिटे देताना व्हायला पाहिजे. डबा अनारक्षित जरी असला तरी एकूण किती तिकिटे विकली गेली आहेत याची अचूक माहिती संगणकीकरण असल्याने शक्य आहे. सर्व स्टेशन्सवरील संगणक इंटरनेटद्वारे जोडलेले असल्यामुळे अनारक्षित डब्यांमध्ये एकूण किती प्रवासी असतील याचा आकडा मिळू शकेल. त्यामुळे भरमसाट तिकिटे विकली जाण्याला व खचाखच गर्दी होण्याला आळा बसू शकेल. सामान्य आर्थिक परिस्थितीत आहेत म्हणून अशा लोकांना अमानवीय रीतीने जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागावा हे अजिबात समर्थनीय वाटत नाही. म्हणून रेल्वे प्रशासनाने कितीही तिकिटे अनिर्बंधपणे विकण्याचा प्रकार थांबवायला हवा.

इतके करूनही काही विशेष प्रसंगी विनातिकीट जाणाऱ्यांमुळे फलाटावर अनावर गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण असे प्रसंग सहसा अचानक उद्भवत नाहीत. त्यांची पूर्वकल्पना असते. त्यामुळे विशेष पोलिस बंदोबस्त ठेवून गर्दीला आवर घालता येईल. शिवाय, जेव्हा अशी प्रचंड गर्दी होते तेव्हा कुठल्याही परिस्थितीत ऐन वेळेवर गाडीचा प्लॅटफॉर्म बदलला जाऊ नये अशा स्पष्ट सूचना सर्व संबंधितांना दिल्या जाणे आवश्यक वाटते. अशा स्वरूपाची उपाययोजना केली गेली नाही तर झालेल्या अपघाताची चौकशी करून फक्त एक औपचारिकता पार पडल्यासारखे वाटेल.

**रवींद्र पंडित**/ ८४२४९८४३५०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस tbedit2016@gmail.com तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक : विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# नांदेडात उद्योग आणणारच

## पालकमंत्री अतुल सावे यांचे आश्वासन



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ फेब्रुवारी**

नांदेड हे मराठवाड्यातील दुसरे मोठे शहर असुन छत्रपती संभाजीनगर प्रमाणेच नांदेडातही उद्योग आणणारच असे आश्वासन पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.

महसुल स्पर्धेच्या समारोपानिमित्त पालकमंत्री नांदेड येथे आले असता पत्रकारांशी बोलत होते. यावेळी खा. अजित गोपछडे, माजी आ. अमर राजुरकर, डॉ. संतूक हंबर्डे, प्रविण साले, किशोर देशमुख, दिलीप कंदकुर्ते, मनोज भंडारी, विजय गंभीरे, संतोष पांडागळे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना पालकमंत्री अतुल सावे म्हणाले की, केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी भरीव तरतुद करण्यात आली आहे. विरोधी पक्षाला अर्थसंकल्पावर नाव ठेवण्याची संधी देण्यात आली नाही. आयकर मर्यादा, किसान क्रेडिट कार्ड, लघू उद्योजक कार्ड, पिकांसाठी योजना, कॅन्सर उपचारासाठी २०० सेंटर, रेल्वेसाठी २३ हजार ७७८ कोटींची तरतुद करण्यात आली आहे. हि तरतुद महाराष्ट्रासाठी असुन यातून नांदेडला देखील वाटा मिळणार आहे. नांदेड हे मराठवाड्यातील दुसरे मोठे शहर आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये नुकतेच ५२ हजार कोटींची गुंतवणुक करून नवीन उद्योग उभारण्यात आला आहे. त्याच प्रमाणे नांदेडात देखील उद्योग युनिट आणण्यात येतील. विकासाच्या बाबतीत नांदेड मागे राहणार नसल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. रस्त्यांच्या बाबतीत देखील विशेष निधी देण्यात येणार असल्याचे आश्वासन यावेळी पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.

# 'संगीत शंकर दरबार'चे एकविसावे वर्ष

## यावर्षी पद्मभूषण पं. बुधादित्य मुखर्जी यांच्यासह दिग्गज कलावंतांची मांदियाळी!

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ फेब्रुवारी**

भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीचे जनक के. डॉ. शंकरराव चव्हाण आणि कुसुमताई चव्हाण यांच्या स्मृतिप्रित्यर्थ महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या संगीत शंकर दरबार महोत्सवाचे हे एकविसावे वर्ष असून सालाबादाप्रमाणे यावर्षीही भरगव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी पद्मभूषण पं. बुधादित्य मुखर्जी, साधना सरगम, देवकी पंडित, प्रविण गोडखिंडी, डॉ. शशांक मक्तेदार, मुग्धा वैशंपायन अशा दिमाज कलावंतांची मांदियाळी आपल्या कलेचे सादरीकरण करणार आहे.

अवघ्या मराठवाड्यातील संगीत रसिक ज्या महोत्सवाची आतुरतेने वाट पाहत असतात अशा या संगीत महोत्सवाचे हे एकविसावे वर्ष असून संस्थेच्या उपाध्यक्षा अमिताताई चव्हाण यांच्या नियोजनाखाली संपन्न होणाऱ्या 'सुगम संगीत संध्या' कार्यक्रमात यावर्षी २५ फेब्रुवारी (मंगळवार) रोजी प्रख्यात गायिका साधना सरगम यांच्या सुश्राव्य गायनाचा 'साधना सरगम संगीत रजनी' हा सुगम संगीताचा बहारदार कार्यक्रम होणार आहे. याच कार्यक्रमात 'संगीत शंकर दरबार जीवनगौरव पुरस्कार २०२५' चे वितरण होणार आहे.

२६ फेब्रुवारी (बुधवार) रोजीच्या कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ०५:३० वाजता गौरी पाठारे यांच्या शास्त्रीय गायनाने होणार आहे. २७ फेब्रुवारी (गुरुवार) हा मराठी भाषा गौरव दिवस, यादिवशीच्या प्रथम सत्रात पहाटे ०६:०० वाजता मुग्धा वैशंपायन यांच्या मुग्धरंग' या सुगम संगीताच्या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन मराठी पहाट' या कार्यक्रमात करण्यात आले असून याचे निवेदन प्रसिद्ध निवेदक विघ्नेश जोशी हे करणार आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा नुकताच प्राप्त झाला आहे, याचा आनंद या कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा केला जाणार आहे. २७ फेब्रुवारी (गुरुवार) रोजी दुसऱ्या सत्रात सायंकाळी ०५:३० वाजता घनंजय जोशी यांचे शास्त्रीय गायन होणार असून ख्यातकीर्त बासरी वादक प्रविण गोडखिंडी यांचे बासरी वादन होणार असून यशवंत वैष्णव हे तबल्यावर साथसंगत करणार आहेत. यानंतर प्रख्यात गायिका देवकी पंडित यांच्या शास्त्रीय गायनाने या संगीत महोत्सवाचा समारोप होणार आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या संगीत महोत्सवातील कार्यक्रम यशवंत महाविद्यालयाच्या क्रीडा मैदानावर उभारण्यात येणाऱ्या भव्य स्वरमंचावर संपन्न होणार आहेत. रसिकांचे भावविश्व समृद्ध करणाऱ्या आणि त्यांच्या उदंड प्रेमाच्या बळावर अवघ्या दोन दशकांत भारतातील अग्रगण्य संगीत महोत्सवांच्या यादीत समाविष्ट झालेल्या संगीत शंकर दरबार महोत्सवाचा अधिकाधिक रसिकांनी लाभ घेण्याचे आवाहन श्री शारदा भवन सोसायटीचे अध्यक्ष अशोकराव चव्हाण, उपाध्यक्षा अमिताताई चव्हाण, सचिव डी.पी. सावंत, सहसचिव प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर, कोषाध्यक्ष ॲड. उदयराव निंबाळकर तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि संयोजन समिती सदस्य संजय जोशी, रत्नाकर आपस्तम्ब, गिरीश देशमुख, प्रा. विश्वाधार देशमुख यांनी केले आहे.

**अनुराधा नांदेडकर यांना जिवन गौरव पुरस्कार**

संगीत क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलावंताला दरवर्षी 'संगीत शंकर दरबार जीवन गौरव पुरस्कार' दिला जातो. यावर्षीचा जीवन गौरव पुरस्कार पं. अण्णासाहेब गुंजकर यांच्या ज्येष्ठ शिष्या अनुराधा नांदेडकर (हिंगोली) यांना २५ फेब्रुवारी रोजीच्या मुख्य कार्यक्रमात प्रदान केला जाणार आहे.

## संक्षिप्त वृत्त

### त्रिरत्नकुमार भवरे कामारीकार यांना कला भूषण पुरस्कार जाहीर



**हिमायतनगर**-पी.एफ.सी संस्था मुखेड व शाहीर महश्री आत्माराम पाटील शाहीर मंच आयोजित छत्रपती शिवाजी महाराज जयंती व संत गाडगेबाबा जयंती व शाहीर आत्माराम पाटील जन्मशताब्दी निमित्त भव्य लोककला महत्त्वाचे आयोजन दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सुजलेगाव तालुका नायगाव जिल्हा नांदेड या ठिकाणी करण्यात आले असून या कला महोत्सवाचे उद्घघाटक खासदार रवींद्र चव्हाण,कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव पाटील शेळगावकर, स्वागत अध्यक्ष दत्ता तुमवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवराज पाटील घोटाळकर, प्रकाश पाटील भिलवंडे, रुपेश देशमुख कुंटूरकर तर मार्गदर्शक म्हणून पत्रकार गजेंद्र गवई बुलढाणा, संयोजक दिगु तुमवाङ,शाहिर बळीराम जाधव सुजलेगावकर अदि सह कलावंत उपस्थित राहणार आहेत. या होणाऱ्या कला महोत्सवात सा.वारसदार चे संपादक बहुजन टायगर युवा फोर्स.व पारंपारिक शाहीर लोक कला संवर्धन मंडळाचे संस्थापक अध्यक्ष त्रिरत्नकुमार मारोतीराव भवरे कामारीकर यांना त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक पत्रकारिता कार्याबद्दल उल्लेखनीय काम असल्यामुळे त्यांना मान्यवरांच्या हस्ते कला भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. भवरे यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे बहुजन टायगर युवा फोर्स जिल्हाध्यक्ष शाहीर शंकरदादागायकवाड,पारंपारिक शाहीर लोककला संवर्धन मंडळाचे प्रदेशाध्यक्ष शाहीर रमेश नारलेवाड,बहुजन टायगर युवा फोस मराठवाडा अध्यक्ष बापूराव जमदाडे, बहुजन टायगर युवा फोस चे संघपाल कांबळे, नागेश कांबळे, पत्रकार अनिल मादसवार,ॲड. ज्ञानेश्वर पंदलवाड, पत्रकार विजय वाठोरे, पत्रकार पांडुरंग मिरासे,शाहीर सुभाष गुंडेकर, गौतम राऊत, बालाजी राऊत, बसवंत कांबळे,लक्ष्मणराव भवरे, अशोक आळणे, जय भीम पाटील, डॉ. कैलास कांनिदे, पत्रकार मनोज शिंदे आदींनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आहे.

### सदस्य नोंदणी पुर्ण केल्याबद्दल कैलास वडजे यांचे अभिनंदन



**नांदेड**-भारतीय जनता पार्टीच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत असून प्रत्येक पदाधिकारी सदस्य नोंदणी कामात व्यस्त आहेत. यात भाजपाचे जंगमवाडी मंडळ उपाध्यक्ष कैलास वडजे यांनी १ हजार सदस्य नोंदणी पुर्ण केली आहे. याबद्दल भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. भारतीय जनता पार्टीच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. कार्यकर्त्यांपासून ते पदाधिकारी सदस्य नोंदणी कामत लागले आहेत. यात भाजपा जंगमवाडी मंडळ उपाध्यक्ष कैलास वडजे यांनी १ हजार सदस्य नोंदणी पुर्ण केली आहे. याबद्दल भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे पत्राव्दारे अभिनंदन केले आहे. तसेच भाजपा महानगर चिटणीस क्षितीज जाधव यांच्यासह जंगमवाडी मंडळाकडुन देखील अभिनंदन होत आहे.

# हिमायतनगर शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त रक्तदान व शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. २३ फेब्रुवारी**




शहरातील छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवानिमित्त त्यांच्या अश्वारूढ पुतळ्याची परमेश्वर मंदिरापासून शहरातील मुख्यरस्त्यावरुन शोभायात्रा काढण्यात आली होती. जय भवानी जय शिवाजी च्या जयजयकार, फटाक्यांची आतिषबाजीने शहर दणाणून गेले होते.

श्री परमेश्वर मंदिरापासून निघालेली शोभायात्रा सराफा लाईन, बजरंग चौक, छत्रपती शिवाजी चौक, पोलीस ठाणे, गणेश चौक, सराफ लाईन, लकडोबा चौक ते परत श्री परमेश्वर मंदिराजवळ आल्यानंतर समारोप करण्यात आला. मिरवणूक यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या युवकांनी परिश्रम घेतले. शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त १९ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबीर, या रक्तदान शिबीरात जास्तीत जास्त जनांनी आपला सहभाग नोंदविला होता. रक्त संकलन करण्याचे कार्य नांदेड येथील जाजाई ब्लड बँक यांनी केले. दि. २० फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याची शोभायात्रा काढण्यात आली. ४ मार्च रोजी हभप निवृत्ती महाराजइंदोरीकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तन सोहळ्यात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित होऊन कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती मंडळाने केले.

# उमरज येथे १०८ कुंडी यज्ञ, हरिनाम सप्ताह व कलशारोहण सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. २३ फेब्रुवारी**



तालुक्यातील श्रीक्षेत्र उमरज येथे श्रीसंत नामदेव महाराज मठसंस्थानाच्या वतीने १०८ कुंडी विष्णूयाग यज्ञ व कलशारोहण सोहळा निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळयासह विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ४ फेब्रुवारी रोजी कलशारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून मंदिरावर हेलिकॉप्टर मधून फुलांची उधळण करण्यात येणार असल्याची माहिती आयोजित पत्रकार परिषदेत एकनाथ नामदेव महाराज यांनी दिली. धार्मिक कार्यक्रमास अनंतश्री विभूषित व्दारकाशारदापीठाधीश्वर जगद्गुरु शंकराचार्य स्वामी श्री सदानंद सरस्वतीजी महाराज श्री शारदापीठ,व्दारकाधाम ( गुजरात)आंतरराष्ट्रीय कथा प्रवचनकार प.पु.श्री.देवकीनंदनजी ठाकूर महाराज (श्री वृंदावन धाम), साधू, संत, नागासाधु, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार,सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, पालकमंत्री अतुल सावे, खासदार, आमदार उपस्थित राहणार आहेत.धार्मिक, सामाजिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

मंदिर बांधकाम पूर्ण झाल्याने कलशारोहण समारंभ आयोजित करण्यात आला आहे.७ दिवस श्रीमद् भागवत कथा, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर आदींचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी प्रशासनाचे मोठे सहकार्य मिळत आहे.हा सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थानच्या वतीने ३१ समित्यांची स्थापना करण्यात आली आहेत. निवास, आरोग्य, पाणी पूरवठा, दर्शन, यज्ञ, भोजन, पार्कींग आदींवर १ हजार सेवेकरी संस्थानच्या गणवेशासह उपस्थित राहणार आहेत,तर २०० महिला सेवेकरीही सहभाग घेणार आहेत. प्रत्येक सेवेकरी यांना कामाची विभागणी करून देण्यात आली आहे. ज्या समितीस ज्या कामाची जबाबदारी दिली आहे त्यांनी तेवढेच काम करायचे आहे.या सोहळ्यास महाराष्ट्रासह तेलंगणा, कर्णाटक, आंध्र प्रदेश आदी राज्यातून दररोज १ लाखापेक्षा अधिक भाविक भक्तांची उपस्थिती राहणार आहे. दि.२७ फेब्रुवारी ते ६ मार्च या कालावधीत होणाऱ्या कार्यक्रमास भाविकांची गैरसोय होऊ नये. यासाठी सुरक्षा बंदोबस्त,आरोग्य सुविधा, विद्युत पुरवठा, बस वाहतूक व्यवस्था, कार्यक्रमाचे स्थळ, स्वच्छता, अग्नीशामक व्यवस्था आदीसाठी प्रशासनाचे योग्य असे सहकार्य मिळणार आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, उपविभागीय अधिकारी श्रीमती अरुणा संगेवार, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.अश्विनी जगताप, कंधारचे तहसीलदार रामेश्वर गोरे, पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव आदींसह सर्व अधिकारी सहकार्य करत आहेत. लोहा - कंधार विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचेही मोलाचे सहकार्य मिळत आहे.भाविक भक्तांनी या सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन मठाधिपती महंत एकनाथ महाराज यांनी केले.

# घरकुल योजनेअंतर्गत माहूर तालुक्यात ४ हजार ८०० लाभधारकांना पहिला हप्ता वितरित

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २३ फेब्रुवारी**

माहूर पंचायत समिती मध्ये शनिवार दि. २२ फेब्रु. रोजी दु. ३ वा. आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान घरकुल योजना (ग्रामीण) अंतर्गत ४ हजार ८०० लाभधारकांच्या खात्यात पहिला हप्ता जमा करण्यात आला. यावेळी आ. भीमराव केराम यांचे मार्गदर्शनात भाजप तालुकाध्यक्ष कांतराव घोडेकर,ओबीसी आघाडीचे प्रदेश चिटणीस अनिल वाघमारे, तालुका सरचिटणीस अपील बेलखोडे, मनीष राठोड या पदाधिकाऱ्यांसह सहाय्यक गटविकास अधिकारी पी. डी.मुरादे, विस्तार अधिकारी बी. जी.कोठेवाड व संगणक चालक खुशाल पवार यांचे हस्ते घरकुल लाभधारकांना मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले. पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण ) अंतर्गत देशाचे गृहमंत्री अमित शहा,मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. २२ फेब्रु. रोजी पुणे येथे महाराष्ट्रातील २० लाख घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व १० लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. त्यानुसार माहूर तालुक्याला पाच हजार घरकुलचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. पंचायत समितीत शनिवारी पार पडलेल्या कार्यक्रमात ४ हजार ८०० लाभधारकांच्या घरकुलला मंजुरी देण्यात आली असून, पहिल्या हप्त्याचेही वितरण करण्यात आले.यावेळी बोलतांना पंतप्रधान आवास योजने अंतर्गत दोनशे लाभधारकांच्या मंजुरीत काही तांत्रिक अडचण निर्माण झाली असल्याने एका महिन्याच्या कालावधीत ती दूर होईल व त्यानंतर त्यांनाही सदरील योजनेचा लाभ मिळेल! अशी माहिती भाजपाचे माहूर तालुका अध्यक्ष कांतराव घोडेकर यांनी दिली.

# प्रधानमंत्री आवास योजनेतून गोरगरीब कुटुंबाच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण : आ. भीमराव केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २३ फेब्रुवारी**



प्रधानमंत्री घरकुल आवास योजना गोरगरीबासाठी वरदान ठरली आहे.जिल्हात सर्वाधीक १८३७५ घरकुले किनवट माहूर तालुक्याला मीळाले. देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोरगरीब कुटुंबांना हक्काचा निवारा उपलब्ध करून दिल्यामुळे लाभार्थ्यांचा आनंद वसंतून वाहत आहे मंजूर घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने कटाक्षाने लक्ष द्यावे अशा सूचना आमदार भिमराव केराम यांनी किनवट पंचायत समीतीच्या सभागृहात घरकुल लाभार्थी प्रमाण पत्र वितरण कार्यक्रमात बोलताना दिले आहेत.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना मंजुरीपत्र व लाभार्थ्यांच्या खात्यात प्रथम हप्ता वितरण कार्यक्रम पंचायत समीती सभागृहात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. गटविकास आधीकारी सुरेश कांबळे यांनी प्रास्तावीकातुन घरकुल योजना व आमलबजावणीची माहीती दीली.राज्य स्तरावर पुणे येथे देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्या शुभहस्ते आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना मंजुरीपत्र व १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित करण्यात आला. किनवट व माहूर या दोन्ही तालुक्यातील एकूण १८३७५ मंजूर घरकुलाचे मंजुरीपत्र पहीला हाप्ता वितरण कार्यक्रम किनवट पंचायत समिती कार्यालयात संपन्न झाला यावेळी आ. भीमराव केराम यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात २०० लाभार्थ्यांना मंजुरीपत्र प्रदान करण्यात आले तसेच पहिल्या हप्त्याची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली

या वेळी भाजपाचे आशोकराव नेम्माणीवार, मा.नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,वैजनाथ करपुडे पाटील ,दत्ता आडे,गजानन कोल्हे विस्तार आधीकारी वसंत वाघमारे,यांची प्रमुख उपस्थीती होती. आ.केराम पुढे म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील प्रधानमंत्री आवास योजना गोरगरीब कुटुंबासाठी वरदान ठरली आहे.यावेळेला जिल्हात सर्वाधीक घरकुले किनवट माहुर तालुक्यात मिळाली आहेत. हक्काचा निवारा मिळाल्याने गोरगरीबाचा आनंद ओसंडून वाहत आहे.मंजूर घरकुलाचे बांधकाम विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने व मनरेगाअंतर्गत मिळणारे २६ हजार रु मजुरी वेळेत मिळावी. घरकुलाच्या रेतीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत. रमाई आवास, शबरी आवास योजना देखील प्रभावीपणे राबविल्या जात असून एकही कुटुंब घरकुलापासून वंचित राहणार नाही अशी ग्वाही आ. केराम यांनी दिली आहे. या कार्यक्रला भाजपाचे पदाधिकारी, पंचायत समिती कार्यालयाचे कर्मचारी, सरपंच लाभार्थी महीला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवालय उद्योग समूहाच्या वतीने मारुती मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ फेब्रुवारी**

नांदेड उत्तर मतदार संघाचे आ.बालाजी कल्याणकर त्यांच्या सौभाग्यवती तथा शिवालय उद्योग समूहाच्या अध्यक्ष, संध्याताई कल्याणकर यांच्या संकल्पनेतून सामाजिक बांधिलकी म्हणून मतदार संघातील सायाळ पाटी परिसरात अप्रतिम असे मंदिराची उभारणी करून श्री मारूती मुर्ती स्थापना व कलशारोहन सोहळा यासह शिवालय उद्योग समूहाच्या कलस्टर या उद्योगाचे उद्घाटन गुरु महंत १०८ जीवनदान महाराज चुडावेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी खंडु गुरु, गोविंद गुरु, उमेश महाराज, काशिनाथ शिवाचार्य, ह.भ.प अच्युत महाराज दस्तापूरकर, आ. आनंदराव बोंढारकर, आ.बालाजी कल्याणकर, सौ. संध्याताई कल्याणकर अध्यक्षा शिवालय उद्योग समुह, सुहास कल्याणकर,अमोल इंगळे जिल्हा उद्योग केंद्र, वर्षाताई नवघरे, विश्वनाथ देशमुख, गंगाधर बडूरे जि.प्रमुख शिवसेना, नारायण कदम सरपंच संघटना जिल्हाध्यक्, संतोष भारसावडे तालुका प्रमुख, प्रल्हाद जोगदंड , देवीदास सरोदे मा.पं. समिती, उमेश दिघे शहर प्रमुख, काशीनाथ बोकारे शेतकरी तालुका प्रमुख, जयवंत कदम, धनंजय पावडे, संतोष मादनवाड, अनिल क्षीरसागर ,बालाजी पावडे, गणेश बोकारे, रमेश पावडे, श्यामराव कल्याणकर, यादवराव कल्याणकर, बाबुराव वाघ, दीपा थोरवट, गीता स्नेहा पाटील, माधव महाराज, दिगाबर पोपळे, सचिन पाटिल सरपंच पोखरणी, भिमराव कल्याणकर, ज्ञानेश्वर कल्याणकर , केशवराव कल्याणकर, राजेश कल्याणकर, एकनाथ कल्याणकर, बालाजी बोकारे, गणेश बोकारे सोमेश्वरकर, विजय कदम, अशोक देशमुख, सुनील सातारे ,गजानन धुमाळ, अंबादास कल्याणकर, दिगंबर कल्याणकर, शरद कदम, अमितजी रावत, परिसरातील महिला पुरुष व शिवालय उद्योग समुहाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना संध्या ताई कल्याणकर यांनी शिवालय उद्योग समूह क्लस्टरच्या माध्यमातून मतदार संघातील हजारो बेरोजगार युवक युवतींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

# चक्री रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातची शक्यता

## हदगाव सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष, एक वर्षापासून दुरुस्ती अभावी वाहनधारकांमध्ये संताप

**तभा वृत्तसेवा**
**निवघा (बा),दि. २३ फेब्रुवारी**



हदगाव-बाळापूर मुख्यमार्गांवर असलेल्या निवघाबाजार ते चक्री रस्त्यावरील निवघा बाजार येथील वार्ड क्रमांक ४ ला पाणीपुरवठा करणाऱ्या ग्रामपंचायतच्या विहिरी लगत मुख्य रस्त्यावर पडलेला भला मोठा पसरट खड्डा अपघाताला निमंत्रण देत आहे. रात्री-अपरात्री दुचाकीस्वारांना हा खर्डा नजरेस येत नसल्याने वाहनधारकांना अपघातास सामोरे जावे लागत आहे. यामुळे वाहनधारकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

निवघा बाजार-बाळापूर रस्त्यावर दिवसाला शेकडो वाहनांची वर्दळ असल्याने हा खड्डा दररोज अनेकांना त्रासदायक ठरत आहे. समोरून येणारे अवजड वाहन याठिकाणी आल्यावर दुचाकीधारकांना कसरत करावी लागत आहे. सदर खड्डा पसरट असल्याने व याच ठिकाणाहून निवघा बाजार येथिल ग्रामपंचायतची वार्ड क्रमांक ४ ला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीला गळती लागून हजारो लिटर पाणी या खरड्यातून वाया जात असून या गळतीचे पाणी सदरील खरड्यात साचल्याने या ठिकाणी चिखल झाल्याने दुचाकी घसरत असून समोरून येणाऱ्या चारचाकी वाहनाच्या टायरला लागुन या ठिकाणी वारोंवार छोटे-मोठे अपघात होत असल्याचे चित्र आहे.

सुदैवाने या ठिकाणी अपघाताच्या छोट्या-मोठ्या घटना वगळता अद्यापपर्यंत अपघाताची कोणतीही मोठी घटना अद्याप पर्यंत घडली नाही परंतु हदगावच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला येथिल वाहनधारकांनी वेळोवेळी सुचना देऊन व विविध वृतपत्रात बातम्या प्रकाशित होऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाने या गंभीर बाबीकडे साफ दुर्लक्ष केले असल्याचेही वाहनधारकांकडून बोलल्या जात आहे. दरम्यान हदगाव सार्वजनिक बांधकाम विभाग या ठिकाणी मोठा अपघात होण्याची वाट तर बघत नाही ना ? असा संतप्त सवालही प्रवासी व वाहनाधारकांमध्ये उपस्थित होवू लागला आहे. निवघा बाजार-चक्री रस्त्याच्या मध्यभागी पडलेला भल्ला मोठा खर्डा हा अपघातास आमंत्रण देणारा व जीवघेणा ठरत असून हदगाव सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ या खरड्याची दुरुस्ती करून वाहनधारकांचे होणारे अपघात टाळावे अशी मागणी वाहन धारकांकडून होत आहे.

# इस्लापूर येथे राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. २३ फेब्रुवारी**

संत गाडगे बाबा यांनी सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रुजविण्यासाठी अविरत परिश्रम घेतले.

आयुष्यभर लोकसेवेचे व्रत अंगीकारत संत गाडगे महाराजांनी कीर्तनातून समाजप्रबोधन केले. महान समाजसुधारक संत गाडगेबाबा महाराज यांना जयंती दिनी इस्लापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे वैराग्यमुर्ती राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्वच्छता अभियान सप्ताह दिनांक २३ फेब्रुवारी पासून ते १ मार्चपर्यंत राबवण्यात येणार असल्याचे समजते स्वच्छता अभियानामध्ये हरिभाऊ लक्ष्मण भवरे यांनी पुढाकार घेतला आहे. चैतन्य महाराज यांचा प्रवचनाचा कार्यक्रम दिनांक २६ रोजी तर गाडगेबाबा व तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर आधारित शाहीर दिगु तुमेवाड यांचा कीर्तनाचा कार्यक्रम दि. १ मार्च रोजी सायंकाळी ठेवण्यात आला आहे. जयंती कार्यक्रमाला उपस्थित इस्लापूर येथील सरपंच प्रतिनिधी नारायण सिनगारे, राजू आंबटवाड, गटपाळे सर, विकास माहुरकर, दत्ता गडलवाड, लक्ष्मण आंबटवाड, ब्रह्मा बैलवाड, गोपाल आंबटवाड, जळबाजी आंबटवाड, जगदीश हनवते, दिनेश मोमीडवाड, शेख लतीफ, सोमु बैलवाड, सोपान बैलवाड, बालाजी आंबटवाड, संदीप शेळके, यांच्यासह असंख्य गाडगेबाबा प्रेमी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान महाशिवरात्री महोत्सवास प्रारंभ

## सप्ताह सोहळ्याचा लाभ घ्यावा ;महंत शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज





**तभा वृत्तसेवा**
**लिंबागणेश दि.२३ फेब्रुवारी**

बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मौजे बेलगाव पो.लिंबागणेश याठिकाणी दि.२० ते २७ फेब्रुवारी दरम्यान महाशिवरात्री महोत्सव संपन्न होत आहे. त्या प्रित्यर्थ अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड विनावादन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवाचा अखंड पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन मार्गदर्शक श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मठाधिपती ह.भ.प. महंत महादेव बाबा भारतीजी व कार्यक्रमाचे आयोजक ह.भ.प.शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती, महोत्सव कमिटीने केले आहे.दि.२० गुरुवार रोजी महोत्सवास प्रारंभ झाला असुन सकाळी भगवान बेलेश्वर महादेवास अभिषेक,ध्वजपुजन करत श्री गणपती पुजनास सकल संतांचे वंदन केले.त्यानंतर वीणा,पखवाज,पेटी यांचे पुजण करण्यात आले. समस्त भाविक भक्तांच्या उपस्थितीत वीणा उभारण्यात आला. महोत्सव कमिटीच्या वतीने पंचक्रोशीतील उपस्थित सरपंच, उपसरपंच, गावातील प्रतिनिधी यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

ह.भ.प. शिवचरित्र बबन महाराज मंझरीकर हवेली ,दि.२१ शुक्रवार रोजी ह.भ.प. युवा किर्तनकार अक्षय महाराज पिंगळे बीड,दि.२२ शनिवार रोजी ह.भ.प. रामायणाचार्य एकनाथ महाराज गाडे चकलांबा दि.२३ रविवार रोजी ह.भ.प.वारकरी भुषण राम महाराज डोंगर आळंदी,दि.२४ सोमवार रोजी ह.भ.प. रामहरी महाराज वायबसे सावरगाव ( सोने) दि.२५ मंगळवार रोजी ह.भ.प.प्रेममुर्ती धर्मराज ( दादा) महाराज श्रीक्षेत्र सामनगाव गुरूपीठ,दि.२६ बुधवार रोजी ह.भ.प.विनोदाचार्य दिपक महाराज बादाडे माजलगाव यांचे किर्तन होणार असुन दि.२७ गुरुवार रोजी ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे , अध्यक्ष बंकटस्वामी संस्थान नेकनुर यांचे काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने सांगता होणार आहे.

विविध धार्मिक कार्यक्रम

बेलेश्वर संस्थान बेलगाव येथील महाशिवरात्री महोत्सवात काकडा,भजण, शिवलीलामृत पारायण, गाथा पारायण, भावार्थ रामायण, हरिपाठ,हरिकिर्तन,जागर अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन या सप्ताहात लिंबागणेश पंचक्रोशीतील भजणी मंडळ उपस्थित राहणार आहेत.

# सौ.के.एस.के.हाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाचा कोकणमध्ये शैक्षणिक सहल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ फेब्रुवारी**

सौ. के. एस. के. महाविद्यालय बीड च्या वाणिज्य विभागाने दिनांक १० ते १२ फेब्रुवारी २०२५ या तीन दिवसांच्या कालावधीत कोकण परिसरात औद्योगिक सहल यशस्वीरित्या आयोजित केली. विभागातील एकूण १८ विद्यार्थ्यांनी या अभ्यास दौऱ्यात सक्रिय सहभाग नोंदवला. वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. सिद्धार्थ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सहलीमध्ये प्राध्यापक नागेश शेट्टे, प्राध्यापक संदीप वळे आणि प्राध्यापिका डॉ. अनिता शिंदे यांनीही विद्यार्थ्यांसोबत सहभाग घेतला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान देण्याच्या उद्देशाने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

तीन दिवसांच्या या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांनी कोकण भागातील प्रमुख औद्योगिक क्षेत्रांना भेटी दिल्या. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी मत्स्य प्रक्रिया उद्योग, काजू प्रक्रिया उद्योग, नारळ आधारित उत्पादने आणि कोकणातील प्रमुख पर्यटन व्यवसाय यांचा जवळून अभ्यास केला. विद्यार्थ्यांनी स्थानिक उद्योजकांशी संवाद साधून ग्रामीण भागातील व्यावसायिक संधी आणि आव्हानांबद्दल माहिती घेतली.

औद्योगिक सहलीनंतर डॉ. सिद्धार्थ जाधव यांनी सांगितले, कोकण परिसरातील या अभ्यास दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना वर्गात शिकलेल्या सैद्धांतिक ज्ञानाची व्यावहारिक बाजू समजून घेण्यास मदत झाली. स्थानिक अर्थव्यवस्था आणि व्यावसायिक संधींविषयी त्यांचे दृष्टिकोन विस्तारले आहेत. प्राध्यापक नागेश शेट्टे यांनी विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाचे कौतुक करताना म्हटले, विद्यार्थ्यांनी सहलीदरम्यान उत्साहाने प्रश्न विचारले आणि स्थानिक उद्योगांविषयी सखोल माहिती घेतली. अशा अभ्यास दौऱ्यांमुळे त्यांच्या वाणिज्य शिक्षणाला पूरक अनुभव मिळतो. सहलीत सहभागी विद्यार्थ्यांनी आपला अनुभव शेअर करताना सांगितले, पाठ्यपुस्तकांमध्ये वाचलेले सिद्धांत प्रत्यक्षात कसे राबवले जातात हे पाहून आम्हाला नवीन दृष्टिकोन मिळाला. कोकणचे निसर्गसौंदर्य आणि तेथील स्थानिक व्यवसायांचा समन्वय पाहून प्रेरणा मिळाली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी अशा शैक्षणिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, विद्यार्थ्यांना वर्गाबाहेरचे शिक्षण देण्यासाठी आमचे महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील असते. औद्योगिक सहलींमुळे विद्यार्थ्यांचा व्यावसायिक दृष्टिकोन विकसित होतो आणि भविष्यातील व्यावसायिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी ते सज्ज होतात. वाणिज्य विभागाने जाहीर केले आहे की, या सहलीच्या अनुभवावर आधारित विद्यार्थ्यांचे प्रकल्प अहवाल महाविद्यालयाच्या वार्षिक अहवालात समाविष्ट केले जाणार आहेत. तसेच पुढील शैक्षणिक वर्षातही अशा शैक्षणिक सहली आयोजित करण्याचे विभागाचे नियोजन आहे.

# प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त व्याख्यानाचे आयोजन




**तभा वृत्तसेवा**
**नेकनूर दि.२३ फेब्रुवारी**

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनूर येथे राज्यशास्त्र व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी 'भारतीय संविधान ओळख' या विषयावर व्याख्यानाचे आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. विठ्ठल जाधव कालिकादेवी कला व विज्ञान महाविद्यालय, शिरूर कासार हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ढास डी.के.हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्राचे विभाग प्रमुख प्रा. विक्रम इनकर यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. विठ्ठल जाधव म्हणाले की, भारतीय संविधानाला ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. भारतीय राज्यघटना जगातील सर्वात मोठी राज्यघटना आहे. आणि लिखित आहे. भारतीय नागरिकांना जसे अधिकार दिले तसेच कर्तव्य दिले आहेत त्याचे विद्यार्थ्यांनी अवलोकन करावे व समाजामध्ये वावरत असताना भारतीय राज्यघटनेच्या नियमानुसार आपण त्याचा वापर करावा. विद्यार्थ्यांनी भारतीय राज्यघटनेचा अभ्यास केला पाहिजे असे आपले मत मांडले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. ढास डी.के. म्हणाले की, समाजामध्ये संविधानाची जनजागृती करणे गरजेचे आहे. तसेच भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेबांनी समाजामध्ये सर्व घटकांना समान अधिकार दिले आहेत. ही राज्यघटना लोकशाही व समाजवाद प्रस्थापित करणारी आहे. भारतीय राज्यघटना जगातील सर्वात मोठी राज्यघटना आहे. विद्यार्थ्यांना राज्यघटने विषयी माहिती असणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अंकुश काळे यांनी केले तर आभार डॉ. राम देशमुख यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अंबाजोगाई शहरात सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या माध्यमातून आगळ्यावेगळ्या स्वरूपात शिवजयंती साजरी करण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमांनी याहीवर्षी शिवजयंती साजरी झाली.

# गेवराईतील अभिनव इंग्लिश स्कुलमध्ये भव्य शिवजन्मोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२३ फेब्रुवारी**

शैक्षणिक ज्ञानदानाबरोबर बाल वयातच विद्यार्थ्यांना छत्रपती शिवरायांचे विचार देऊन त्यांच्या मनावर शिव विचारांची प्रेरणा रुजविण्याचे काम अभिनव इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून होत आहे ही कौतुकास्पद बाब आसल्याचे प्रतिपादन सायं.दै.रिपोर्टरचे तालुका प्रतिनिधी पत्रकार भागवत जाधव यांनी केले.

गेवराई शहरातील कोल्हेर रोड वरील अभिनव इंग्लिश स्कुलमध्ये मंगळवार दि.१८ फेब्रुवारी रोजी अखंड विश्वाचे प्रेरणास्रोत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सायं.दै.रिपोर्टरचे तालुका प्रतिनिधी पत्रकार भागवत जाधव, पत्रकार विनोदजी नरसाळे, तलवाडा पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मोहन राठोड, शाळेचे प्राचार्य कृष्णा गांडूळे सर उपस्थित होते. प्रमुख मान्यवरांचा शाळेच्या



वतीने प्राचार्य कृष्णा गांडूळे यांनी यथोचित सत्कार केला. दरम्यान पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, शाळेच्या नावाप्रमाणेच 'अभिनव ' असे उपक्रम राबवणारी शाळा म्हणजे अभिनव इंग्लिश स्कूल असून शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने चिमुकल्यांना शिवरायांच्या जीवन चरित्रावर विविध उपक्रम राबवून त्यांना शिवविचार देण्याचे पवित्र काम या शाळेच्या वतीने होत असल्याचे सांगत त्यांनी शाळेच्या संचालक मंडळाचे कौतुक केले व येणाऱ्या काळात ही शाळा गेवराईच्या शैक्षणिक क्षेत्रात मोठा नावलौकिक मिळवेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान शिवजन्माचा इतिहास व पराक्रम हा ऐतिहासिक भाषा आणि पोषाखात साभिनय सादरीकरण इयत्ता तिसरी वर्गाने केले. आदर्श राजा 'शिवछत्रपती' ही विचार मालिका इयत्ता दुसरी च्या वर्गाने सादर केली.

मुले शाळेत येताना ते अगदी चिखलाच्या गोळ्याप्रमाणे असते त्याला योग्य आकार देण्याचे काम गुरूजन करत असतात असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे पोलिस उपनिरीक्षक मोहन राठोड यांनी केले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते सहशालेय उपक्रमात प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी अनय काकडे, प्रांजल काकडे, ओवी पवार, ज्ञानदा वादे, वैदेही नाटकर, सानवी पट्टे, राजवीर काकडे, आविष्कार सानप, अंश चितळे यांनी भाषणे सादर केली. इयत्ता चौथीच्या मुलींनी आले मराठे या गाण्यावर नृत्य सादर केले. नर्सरी आणि एल.के.जी च्या विद्यार्थ्यांनी एकच राजा या गाण्यावर नृत्य सादर केले. इयत्ता पहिली व एल.के.जी ने 'राजं आलं राजं आलं' या गाण्यावर नृत्य सादर केले. यु.के.जी वर्गाने दैवत छत्रपती या गाण्यावर नृत्य सादर केले. ओजस कुलकर्णी ने वैयक्तिक शिवगीत गायन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य कृष्णा गांडुळे सरांच्या मार्गदर्शनाने प्रदिप चव्हाण, अश्मा पठाण, प्रियंका काळे, प्रतिक्षा साळवे, वैभव निवारे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य कृष्णा गांडूळे यांनी सुत्रसंचालन अंकिता मोटे यांनी केले तर शेवटी शितल मोंढे यांनी उपस्थितीतांचे आभार मानले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महेश नळगे यांची लागणार जिल्हाप्रमुखपदी वर्णी!



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील परतुर-मंठा मतदार विधानसभा संघातील शिवसेना उबाठा गटाचे निष्ठावंत कार्यकर्ते महेश नळगे यांची उबाठा शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदी वर्णी लागणार असल्याचे खात्रीलायक वृत्त प्राप्त झाले असुन त्यांची वर्णी लागल्यास पुन्हा एकदा परतुर-मंठा याभागात शिवसेना उबाठा गट मजबुत स्थितीत भरारी घेणार असल्याची चर्चा या भागातील नागरीक करू लागले आहे.

उबाठा शिवसेना गटाचे तत्कालीन जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे यांनी गेल्या महिन्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्याने उबाठा गटाच्या जिल्हाप्रमुखपदाची जागा रिक्त झाली होती, या भागातील महेश नळगे यांचे कार्य पाहता त्यांनी केलेल्या निष्ठेची दखल घेऊन पक्ष त्यांना सध्या मोठी जबाबदारी देण्याच्या विचारात आहे. त्यांना जबाबदारी दिल्यास या भागातील कोमजलेली शिवसेना (उबाठागट) पुन्हा एकदा नळगे यांच्या नेतृत्वाखाली भरारी घेऊ शकते त्यामुळे पक्ष नळगे यांच्याबाबतीत सकारात्मक असुन त्यांना जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी देणार असल्याचे खात्रीलायक वृत्त प्राप्त झाले आहे.

# गजानन मंदिर परिसरात विकास कामे पूर्ण करणार -आ.अर्जुनराव खोतकर

## समर्थ नगर येथे सभागृहाचे आ.खोतकरांच्या हस्ते भूमीपूजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

समर्थ नगर भागातील संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज मंदिर परिसरात भाविकांच्या सोईसाठी पायाभूत सुविधा पुरविण्यात येतील. अशी ग्वाही शिवसेना उपनेते, माजी मंत्री, आ. अर्जुनराव खोतकर यांनी दिली.



गजानन महाराज प्रकट दिनाचे औचित्य साधून गुरुवारी ( ता. २०) समर्थ नगर भागातील गजानन महाराज मंदिर परिसरात १० लक्ष रूपये किमतीच्या सभागृहाचे भूमीपूजन आ.अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ह. भ. प. नाना महाराज पोखरीकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, अँड.राहुल हिवराळे, अँड. दिपक कोल्हे ,शरद ढाकणे, राजू जगताप, स्वप्नील हिवराळे,शुभम देशमुख,सौरभ भिसे, अमोल पाडमुख, शिरसाठ,पैठणकर , यांच्या सह महिला व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आ. अर्जुनराव खोतकर यांनी लवकरच हायमॅक्स बसविले जाणार असून उर्वरित विकास कामे ही पूर्ण केली जातील असे सांगितले.

## संक्षिप्त

### स्वमान: मायक्रो फायनान्ससह शाश्वत भविष्याकडे नेणारा मार्ग

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना आर्थिक सेवा देऊन भारतात आर्थिक समावेशन वाढविण्यात मायक्रो फायनान्स ने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महिला सक्षमीकरणासाठी हे एक महत्त्वाचे साधन बनले आहे, जे जीवन आणि समुदाय यांच्यात परिवर्तन घडवून आणणाऱ्या संधी प्रदान करते आहे.

महाराष्ट्रातील चाळीसगाव येथील धाडसी महिला रत्नादेवी यांच्या बाबतीत. एका दुखःद घटना घडली , त्याचे पती गमावल्यानंतर, रत्ना यांना दोन मुलांचे संगोपन स्वतः करावे लागले. या प्रचंड आव्हानाला तोंड देताना, तिला तिच्या मुलांसाठी त्यांचे जीवन पुन्हा उभे करण्यासाठी मायक्रो फायनान्सची ताकद मिळाली. अडचणी असून ही, रत्नादेवी यांनी उदर निर्वाहासाठी अनेक अर्धवेळ नोकऱ्यांमध्ये अथक परिश्रम केले. हळूहळू, तिच्या कष्टाचे फळ मिळू लागले आणि तिच्या मोठ्या मुलाला एका बांधकाम दुकानात नोकरी मिळाली. आपल्या मुलाचे स्वतःचा व्यवसाय करण्याचे स्वप्न साकार करण्यास मदत करण्याचा दृढनिश्चय करून, रत्नादेवी यांनी कर्जासाठी स्वमान फायनान्शियल सर्व्हिसेसशी संपर्क साधला. स्वमानच्या सोप्या, परवडणाऱ्या आणि तारणमुक्त कर्जामुळे रत्नाला वेळेवर आवश्यक असलेली आर्थिक मदत मिळाली. कर्जाच्या मदतीने, तिच्या मुलाने स्वतःचे दुकान सुरू केले, जे लवकरच कुटुंबासाठी उत्पन्नाचे एक विश्वसनीय साधन बनले. तिच्या मुलाच्या यशाने प्रेरित होऊन, तिने शेळीपालन व्यवसाय सुरू करण्यासाठी स्वमानकडून दुसरे कर्ज घेतले, ज्यामुळे तिला घरून काम करता आले आणि उत्पन्नाचा दुसरा स्रोत निर्माण करता आला. रत्ना आता आशेने बोलते: माझ्या पतीच्या अकाली निधनाने माझे आयुष्य उद्ध्वस्त झाले. माझ्या मुलांचे संगोपन करण्याची जबाबदारी सतत चिंतेचा विषय होती पण स्वमानच्या मदतीने मी माझ्या मुलांचे संगोपन करू लागले आणि कुटुंबाचे स्थिर उत्पन्न सुनिश्चित करू शकले. आमच्या दोन्ही व्यवसायांनी आमचे जीवन बदलून टाकले आणि यासाठी मी स्वमानची खूप आभारी आहे. भविष्यात स्वमानची आपल्याला काय मदत होईल हे पाहण्यासाठी मी उत्सुक आहे.

### शेतकरी सन्मान समारंभ कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे कृषी अधिकारी यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालय व कृषि विज्ञान केंद्र, खरपुडी जालना यांच्या संयुक्त विद्यमाने मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे शुभहस्ते पी.एम.किसान योजनेचा १९ वा हप्ता वितरण कार्यक्रम (लाईव्ह वेबकास्टींग) तथा शेतकरी सन्मान समारंभ कृषि विज्ञान केंद्र, खरपुडी येथे सोमवार दि. २४ फेब्रुवारी २५ रोजी पी.एम. किसान योजनेचा १९ वा हप्ता वितरण कार्यक्रम भागलपूर, बिहार येथून ऑनलाईन पध्दती द्वारे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण वेबकास्टींग द्वारे कृषि विज्ञान केंद्र, खरपुडी येथे आयोजित करण्यात आले आहे.तरी सदरील कार्यक्रमास दुपारी १ वाजता मंठा तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी उपस्थितीत राहावे , असे आवाहन तालुका कृषी अधिकारी दयानंद वाघमोडे व मंडळ कृषी अधिकारी दिलीप सुर्यवंशी यांनी केले आहे.

### घरातून अवैध दारू विक्री करणाऱ्यावर; पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा शहरातील जवाहर कॉलनी येथील एका पडक्या घरामध्ये अवैधरीत्या विनापरवाना दारू विक्री करणाऱ्या एक जणांवर मंठा पोलिसांनी कार्यवाही केली आहे. ४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असुन याप्रकरणी पोलीस अंमलदार मंगेश चौरे यांच्या फिर्यादीवरून विष्णू देविदास गायकवाड राहणार मंठा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चव्हाण करत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

# अवैध वाळू वाहतुकीचे बळी; मध्यरात्री वाळूचा टिप्पर घरावर ओतल्याने पाच जणांचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

अवैधरित्या वाळूचा उपसा करून वाहतूक करणाऱ्या टिप्परने पहाटे साडेतीन वाजेच्या सुमारास थेट पत्र्याच्या शेडवर वाळू ओतल्याने वाळूच्या ढिगाऱ्याखाली दबून पाच जणांचा मृत्यू झाला आहे. गावकऱ्यांनी धाव घेतल्याने वाळूच्या ढिगाऱ्याखालून एक लहान मुलीला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे. इतर पाच जणांचा मात्र जागेवरच मृत्यू झाला आहे. जाफराबाद तालुक्यातील पासोडी शिवारात एका पुलाच्या कामासाठी हे मजूर आले होते. पुलाच्या बांधकामाच्या ठिकाणाजवळच असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये हे कुटुंब झोपलेले होते. पहाटे साडेतीन वाजता आलेल्या वाळूच्या टिप्परचालकाने निष्काळजी पणाने वाळूचा टिप्पर पत्र्याच्या शेडवर रिचवल्याने शेडमध्ये झोपलेले ६ जण ढिगाऱ्याखाली दाबले गेले. घरात समोरच्या खोलीत झोपलेल्या महिलेच्या हा प्रकार लक्षात हा प्रकार तिने आरडाओरडा केला असता टिप्परचालकाने तेथून पळ काढला. महिलेने आजूबाजूच्या गोठ्यावर जाऊन शेतकऱ्यांना बोलावून



आणले असता त्यांनी वाळू बाजूला करून पाच जणांना बाहेर काढले. त्यापैकी एक १२ वर्षीय मुलगी मुलीला वाचवण्यात यश आलं आहे. मात्र इतर पाच जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये गणेश काशिनाथ धनवई (वय -५०) रा. गोळेगाव, ता. सिल्लोड, भूषण गणेश धनवई (वय १७) रा. गोळेगाव, ता. सिल्लोड, राजेंद्र दगडूबा वाघ (वय -४०) रा. दहिद, ता. बुलढाणा, सुनील समाधान सपकाळ, वय -२० रा. पद्मावती, ता. भोकरदन जि. जालना, सुपडू आहेर, (वय ३८) रा. तोंडापूर, ता. जामनेर, जि. जळगाव अशी मृतकांची नावे आहेत. मृतक सर्वजण एकमेकांचे सख्खे नातेवाईक आहेत. रवींद्र आनंद या ठेकदाराचे हे काम सुरु आहे. या कामासाठी स्वस्त वाळू उपलब्ध व्हावी या उद्देशाने ठेकेदार रात्रीच्या वेळी अवैध वाळू उपसा करून टाकत होता. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे पाच जणांचा मृत्यू झाला आहे. पहाटे साडेतीन वाजता ही घटना घडली असता जाफ्राबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक इंगळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतकांचे शव ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता स्थानिक गावकऱ्यांनी पंचनामा न करता शव ताब्यात घेऊ नये असा पवित्रा घेतला. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा केला. अवैध वाळूचा विषय असल्याने महसूल पथकालाही पाचारण करण्यात आले असल्याची माहिती पोलीस निरिक्षक इंगळे यांनी दिली. राज्यात वाळू उपसा बंदी असूनही अवैधरित्या सर्रास वाळूउपसा सुरू आहे. राजकिय वरदहस्त आणि पोलीस व महसूल अधिकार्यांया आशिर्वादाने ठेकेदार मुजोर झाले आहेत.

# रोटरी इंटरनॅशनलचा सर्वोच्च पुरस्कार रो.अरुण अग्रवाल यांना जाहीर



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

निरंतर निस्वार्थ आणि असामान्य समाजसेवा करणाऱ्या रोटरी सदस्यास दरवर्षी रोटरी इंटरनॅशनतर्फे प्रदान केला जाणारा यंदाचा सर्विस अबाऊ सेल्फ (ड्शी-ींळलश -र्लीश ड्शश्रष) हा सर्वोच्च व्यक्तिगत पुरस्कार ज्येष्ठ रोटरियन अरुण अग्रवाल यांना जाहीर झाल्याची माहिती प्रांतपाल रो. सुरेश साबू यांनी दिली. रोटरीच्या आजवरच्या ६५ वर्षाच्या इतिहासात दुसऱ्यांदा जालन्याला हा बहुमान प्राप्त झाला असून, यापूर्वी ज्येष्ठ नेत्ररोग तज्ञ स्व. रो. दिनकर आंबेकर यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

रो. अरुण अग्रवाल यांची रोटरी इंटरनॅशनलच्या सर्वोच्च पुरस्कारासाठी निवड होणे ही संपूर्ण रोटरी प्रांत - ३१३२ साठी अत्यंत गौरवाची बाब आहे. समाजसेवेसाठी त्यांनी दिलेल्या अनमोल योगदानाची दखल घेत हा सन्मान त्यांना प्रदान केला जाणार आहे. रोटरीचे ब्रीदवाक्य असलेल्या ड्शींीळलश -र्लीश ड्शश्रष म्हणजेच स्वतःच्या हितापेक्षा सेवेस प्राधान्य या तत्त्वज्ञानावर चालणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. समाजासाठी निःस्वार्थपणे आणि सातत्याने सेवा करणाऱ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाचा गौरव हा पुरस्काराने केला जातो. रो. अरुण अग्रवाल यांची या सन्मानासाठी निवड झाल्याने संपूर्ण रोटरी परिवारात आनंद आणि उत्साहाचे वातावरण आहे.

# रमजान महिन्यात एक दिवसा आड़ पाणीपुरवठा करावा -एमआयएम

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन शहरात एमआयएम पक्षाच्या कार्यकर्त्यांनी खासदार कल्याण काळे यांना निवेदन सादर केले. आहे की रमजान महिन्यात पाण्याची योग्य व्यवस्था करावी आणि एक दिवसां आड़ पाणीपुरवठा करावा. भोकरदन दानापूर धरण भरल्यानंतरही शहरात १५ दिवसांतून एकदा पाणीपुरवठा होत होता, तरीही अधिकाऱ्यांनी यावर काहीसे मौन बाळगले आहे. भोकरदन शहरात आणि ज्या ठिकाणी पालिकेचे पाणी पोहोचत नाही अशा ठिकाणी टैनकर ने एक दिवसां आड़ पाण्याची व्यवस्था करावी अशी एमआयएम पक्षाची मागणी आहे. त्या वरील सर्व समस्या लवकर सोडवल्या पाहिजेत अन्यथा एमआयएम कार्यकर्त्यांना आंदोलनात्मक पावले उचलण्यास भाग पाडले जाईल. तसेच पहाटे २ ते सकाळी ६ वाजेपर्यंत सेहरी दरम्यान आणि संध्याकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत इफ्तार दरम्यान, संपूर्ण तहसील परिसरात वीजपुरवठा उपलब्ध असावा. रमजान महिन्यात, तहसील क्षेत्रातील मरकज मोहल्ला, उस्मानपेट, हबीब कॉलनी, रफिक कॉलनी इत्यादी



शहरांमधील मशिदी आणि मदरशांच्या आसपास स्वच्छता राखली पाहिजे. यामध्ये स्वच्छता व्यवस्थेची अधिक गरज आहे आणि नगर परिषदेच्या कार्यकारी अधिकाऱ्यांना शहरातील कचरा उचलण्याचे निर्देश द्यावेत, तर स्वच्छता व्यवस्था सुरळीत होईल. शहर परिसरातील वीज खांब पालिकेकडून चालवले जातात. या खांबांवरील दिवे कधीकधी खराब होतात. अशा खांबांच्या लाईन्स तात्काळ दुरुस्त कराव्यात. शहरात अनेक ठिकाणी विजेचे खांब आणि त्यांच्या तारा जीर्ण अवस्थेत आहेत, ते त्वरित बदलावेत.

# आ.खोतकर यांच्या प्रयत्नाने कोर्ट फी स्टँप, बाँड पेपरचा साठा उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्ह्यात अनेक दिवसांपासून ५ रुपयाचे कोर्ट फी तिकीट आणि १०० व ५०० रुपये मूल्याच्या बाँड पेपरच्या तुटवड्यामुळे नागरिक आणि वकिलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या समस्येबाबत ॲड. महेश धन्नावत यांनी आ. अर्जुनराव खोतकर यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानंतर आमदार खोतकर यांनी तातडीने लक्ष घालून प्रशासनाला आवश्यक निर्देश दिल्यानंतर अखेर ही समस्या सोडवण्यात यश आले असून, जिल्हा कोषागार कार्यालयाकडे २० कोटी ७१ लाख मूल्याचा साठा उपलब्ध झाल्याची माहिती ड. धन्नावत यांनी दिली.


पाचशे रुपयांचे बॉण्ड आणि पाच रुपयाचे कोर्ट फी तिकीट उपलब्ध नसल्याने विविध न्यायालयीन प्रक्रियांमध्ये अडथळे येत होते. याशिवाय पाच रुपयाला ऐवजी दहा रुपयांचे कोर्ट फी तिकीट वापरावी लागत असल्याने वकिलांना आणि नागरिकांना मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत होता. ड. धन्नावत यांनी याबाबत मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करूनही काही उपयोग न झाल्याने त्यांनी पंधरा दिवसांपूर्वी आ. खोतकर यांची भेट घेऊन, ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी तात्काळ जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांच्याशी संपर्क साधून, ही समस्या दूर करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार जालना जिल्ह्यात ५ रुपयाचे कोर्ट फी तिकीट तसेच १०० आणि ५०० रुपये मूल्याचे बाँड पेपर मुबलक प्रमाणात उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे वकील मंडळी आणि नागरिकांना स्टँपपेपरच्या तुटवड्यामुळे होणाऱ्या त्रासाला सामोरे जावे लागणार नाही तसेच अतिरिक्त खर्च वाचणार आहे. आता हा पुरवठा सुरळीत झाल्याने न्यायालयीन कामकाज वेगाने होणार आहे. ॲड. महेश धन्नावत, ॲड. ब्राह्मानंद चव्हाण, ॲड. शुभम भारुका, ॲड. अभय पाचपुते, ॲड. खरात आणि इतर वकिलांनी या समस्येवर वेळीच तोडगा काढल्याबद्दल समाधान व्यक्त केले आणि जिल्हा कोषागार अधिकारी पंजाब पुंडगे यांची भेट घेऊन भविष्यात अशी समस्या उद्भवू नये म्हणून प्रशासनाने सतत पुरवठ्याची व्यवस्था ठेवावी, अशी मागणी केली व आमदार खोतकर यांनी घेतलेल्या तातडीच्या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त केले.

## जालन्यातील उजास ग्रीन क्लॉथ पेंड मॅन्युफॅक्चरिंग युनिटचे साजरे केले एक वर्ष

# 'उजास' आणि बिल अँड मेलिंडा गेट्स फाउंडेशनकडून स्थानिक महिलांचे सक्षमीकरण

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

'उजास' संस्था बिल अँड मेलिंडा गेट्स फाउंडेशनच्या सहकार्याने जालना येथील त्यांच्या 'उजास' ग्रीन क्लॉथ पेंड मॅन्युफेक्चरिंग युनिटचा पहिला वर्धापन दिन अभिमानाने साजरा करत आहे. शाश्वत क्लॉथ पेंड तयार करण्याच्या उद्देशाने सुरु करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे स्थानिक बचत गट (एसएचजी) महिलांना उपजीविकेच्या मोलाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. हा मोलाचा टप्पा साजरा करण्यासाठी आज जालन्यात एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला 'उजास', जिल्हा व स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी आणि सुमारे २,००० उपस्थितांची मोठी गर्दी होती. जालनाभरातून एकत्र आलेले १,२०० स्वयंसेवा गट, स्थानिक शाळांमधील किशोरवयीन मुली आणि व्यापक समुदायाचे सदस्य यांचा उपस्थितांमध्ये समावेश होता. सर्व उपस्थितांनी मासिक पाळी आरोग्य आणि स्वच्छता व्यवस्थापनावरील जागरूकता कार्यशाळांमध्ये आणि 'पीरियड मेला मध्ये सहभाग घेतला. यामध्ये स्थानिक खरेदीदारांसाठी विविध उत्पादनांचे प्रदर्शन व




विक्री करण्यात आली. याशिवाय जालना महानगरपालिकेनेही पर्यावरणपूरक मासिक पाळीच्या उत्पादनांचा अवलंब करण्याबाबत जागरुकता वाढवण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी 'उजास सोबत सहकार्य केले.

सुरुवातीपासूनच या उपक्रमाचा बचत गटातील महिलांवर लक्षणीय परिणाम झाला असून यांपैकी अनेक महिलांना स्थिर उत्पन्न मिळाले आहे. त्यांचे मासिक उत्पन्न सरासरी १०,००० रुपयांपर्यंत पोहोचले आहे. या आर्थिक स्वातंत्र्यामुळे त्यांचे राहणीमान सुधारले आहेच, शिवाय त्यांना अधिक स्वायत्तता मिळाली आहे. तसेच मासिक पाळीच्या आरोग्य आणि स्वच्छता व्यवस्थापनाबद्दल त्यांच्यामध्ये जागरुकता वाढली आहे. कौशल्य विकास आणि आर्थिक साक्षरतेद्वारे समुदायांना उन्नत करतानाच शाश्वत आणि स्वच्छ मासिक पाळीच्या केअर सोल्यूशन्स तयार करण्याच्या उजास'च्या ध्येयाशी हा उपक्रम पूर्णपणे सुसंगत आहे.

जालना महानगरपालिकेचे आयुक्त श्री. संतोष खांडेकर म्हणाले, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात शाश्वत मासिक पाळीच्या उत्पादनांचा वापर करण्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी 'उजास सोबत सह्योग करण्याचा आम्हाला अभिमान आहे. केवळ शाश्वत प्रकल्पांवर काम करणे एवढेच नव्हे तर उपजीविका निर्मितीला प्रोत्साहन देणे हा आमचा उद्देश आहे. कापडी पेंड तयार करण्यासाठी बचत गटांच्या सहकार्याचे उल्लेखनीय परिणाम दिसून आले आहेत. आदिवासी महिलांमध्ये जागरूकता वाढल्याने मासिक पाळीच्या आरोग्य व्यवस्थापन पद्धती सुधारल्या आहेत. हा वेग असाच वाढेल, त्यामुळे अधिक महिला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होतील आणि त्यांचे मासिक पाळीचे आरोग्य प्रभावीपणे व्यवस्थापित करू शकतील, असा आम्हाला विश्वास आहे. शिवाय, जालना महानगर पालिका 'उजास'कडून एकूण पेंड उत्पादनापैकी ५० टक्के पेंड खरेदी करून या उपक्रमाला एक पाऊल पुढे नेणार आहे. हे पेंड स्थानिक औषध दुकाने आणि सार्वजनिक ठिकाणी अनुदानित किमतीत उपलब्ध करून दिले जातील, ते सर्वांना मिळतील, याची सुनिश्चिती करण्यात येईल.

कार्यक्रमाचा समारोप करताना 'उजास'च्या सरव्यवस्थापक कु. पूनम पाटकर म्हणाल्या, गेल्या एका वर्षात सहभागी झालेल्या सर्व बचत गटांचे, स्थानिक मुख्याध्यापकांचे, शाळा व्यवस्थापनाचे, विद्यार्थ्यांचे, समुदायाचे आणि जालना महानगरपालिकेचे आम्ही आभार मानतो. उजास'मध्ये आमची कटिबद्धता शाश्वत मासिक पाळीच्या उत्पादनांच्या निर्मितीपलीकडे आहे महिलांना योग्य कौशल्ये आणि संसाधनांनी सुसज्ज करून सक्षमीकरण करण्यासाठी आम्ही समर्पित आहोत. गेल्या वर्षभरात, आम्ही बचत गटातील महिलांना १०० शिलाई मशीन प्रदान करून कापड पेंड उत्पादनाचा प्रवास सुरु करण्यासाठी आवश्यक साधने त्यांना उपलब्ध होतील, याची निश्चिती करण्यात आली आहे. याशिवाय त्यांच्या सुरुवातीच्या प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी आम्ही कापड पेंड रोल मोफत पुरवले आहेत. त्यामुळे आर्थिक भार न पडता त्यांना त्यांचे उत्पादन सुरु करता येते. उपजीविका निर्मिती, आर्थिक स्वातंत्र्य आणि मासिक पाळीबद्दल आरोग्य जागरूकता वाढवण्याच्या आमच्या व्यापक ध्येयाचा हा उपक्रम म्हणजे पुरावा आहे. आम्ही पुढे जात असताना आमचे क्षेत्र वाढवण्यासाठी, अधिक महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि समुदायांमध्ये शाश्वत मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन बळकट मजबूत करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# ४२ हजार ९३८ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचे मंजुरी पत्र



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या शुभहस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज मंत्री यांच्या उपस्थितीत महा आवास अभियान २०२४-२५ अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा २ मधील राज्यातील वीस लक्ष लाभार्थ्यांना घरकुलाचे मंजुरी पत्र व किमान १० लक्ष घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरणाचा गृहोत्सव कार्यक्रम पुणे येथे आयोजित केला होता.

त्यानुषंगाने हिंगोली जिल्ह्यातील ४८ हजार ५१७ लाभार्थ्यांपैकी ३३ हजार ४४६ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आला आहे. तसेच ४२ हजार ९३८ लाभार्थ्यांना मंजुरी पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या षटकोनी सभागृहात मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले आहे. या कार्यक्रमास हिंगोली तालुक्यातील अंधारवाडी, पिपळखुटा, सावरखेडा व कळमनुरी तालुक्यातील मसोड येथील लाभार्थी उपस्थित होते. आज पुण्यात पार पडलेल्या कार्यक्रमासोबत राज्यातील जिल्हा, तालुका व ग्राम पंचायत स्तरावर घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण जिल्हा, तालुका व ग्राम पंचायत स्तरावर व्हिडीओ कॉन्फरन्स व्दारे करण्यात आले होते. हिंगोली जिल्ह्यातील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बोधनकर, पाटील, सारस्वत, मेकाले, काळे, इंगोले इत्यादी सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

औंढा नागनाथ पंचायत समितीच्या सभागृहामध्ये २२ फेब्रुवारी रोजी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा क्रमांक दोन अंतर्गत मंजुरी पत्र व पहिला हप्ता वितरण कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास संजय दराडे, साहेबराव देशमुख, गटविकास अधिकारी गोपाल कल्हारे, सहाय्यक गटविकास अधिकारी बालाजी गोरे उपस्थित होते. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा क्रमांक दोन अंतर्गत घरकुल लाभार्थी यांना २० लाख मंजुरी आदेश व दहा लाख लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री ग्रामविकास व पंचायत राज यांच्या उपस्थितीत थेट प्रक्षेपण कार्यक्रम द्वारे घरकुल लाभार्थी यांच्या खात्यावर घरकुलाचा पहिला हप्ता टाकण्यात आला. औंढा नागनाथ तालुक्यात ९ हजार ५९७ घरकुलाला मंजुरी मिळाली असून ४ हजार ७०० घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर पहिला हप्ता प्रदान करण्यात आला आहे ,अशी माहिती गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे यांनी दिली आहे.

यावेळी मा.जिल्हा परिषद सदस्य संजय दराडे, शिवसेना( शिंदे गट) तालुकाप्रमुख साहेबराव देशमुख, राष्ट्रवादी युवाजिल्हाध्यक्ष आदित्य आहेर,गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे, सहाय्यक गटविकास अधिकारी बालाजी गोरे, विस्तार अधिकारी सय्यद, राधेश्याम परांडकर, अंबादास कुहिरे, राजू सवनेकर यांच्यासह घरकुल कॉम्पुटर ऑपरेटर व घरकुललाभार्थी यावेळी उपस्थित होते.

# दुर्गम भागातील वैष्णवीची यशस्वी गरूडझेप, वडीलांचे स्वप्न पूर्ण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**

औंढा तालुक्यातील गोजेगाव सारख्या दुर्गम, डोंगराळ भागातील एका कन्येने आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर यशस्वी गरुडझेप घेतली आहे. २०१९ साली केवळ १० गुणांवरून एमबीबीएसला प्रवेश न झाल्यामुळे वडिलांच्या प्रेरणेने आणि स्वतःच्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर गोजेगावसारख्या डोंगराळ, ग्रामीण भागातून परदेशी शिक्षण घेऊन आपली एमबीबीएसची डिग्री पूर्ण करून ग्रामीण आणि शहरी भागातील पालक, तरुण विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण केला आहे. फिलिपिन्स देशात शिक्षण घेताना डॉ.वैष्णवीने कोरोना सारख्या खडतर काळात सतत दोन वर्षे आई-वडिलांची भेट झाली नाही तरीही आपले शिक्षण अखंड सुरू ठेवत यशाला गवसणी घातली. त्यानिमित्ताने गोजेगावची भूमीकन्या कु. डॉ.वैष्णवीचा समस्त गोजेगावकर मंडळींच्या वतीने सामूहिक सत्कार करण्यात आला. डॉ.वैष्णवीचा सत्कार आहे असे कळताच औंढा नागनाथ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री गणपत राहिरे यांनी आपल्या पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांसह गोजेगावात दाखल होत हनुमान मंदिरासमोर पुष्पहार, शाल, पेढा भरवून सत्कार केला. यावेळी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणाऱ्या वैष्णवी जायभाये या विद्यार्थिनीबद्दल गौरवोद्गार काढताना पोलीस निरीक्षक गणपत राहिरे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोबाईल, सोशल मीडियाचा नाद सोडून यशाला गवसणी घालण्याचे आवाहन केले. याप्रसंगी डॉ.वैष्णवीचे पालक प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये व सौ. विमल जायभाये यांचा देखील सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पंडितराव सांगळे, औंढा नागनाथ पंचायत समितीचे माजी सभापती राजेंद्र सांगळे, सरपंच सौ. वर्षा अच्युत नागरे, उत्तमराव नागरे, शेषराव सांगळे, ज्ञानदेव जायभाये, नामदेव जायभाये, पांडुरंग सांगळे, आकाश जायभाये, बाळू सांगळे, तुकाराम कागणे, बाळासाहेब जायभाये, पंढरीनाथ जायभाये, यांच्यासह गावातील असंख्य मंडळी उपस्थित होती.

# वसमतमध्ये स्पर्श कुष्ठरोग जनजागृतीनिमित्त मॅरेथॉन रॅली



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २३ फेब्रुवारी**

येथे स्पर्श कुष्ठरोग जनजागरण मोहीम निमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी मा.डॉ. गंगाधराव काळे वैद्यकीय अधीक्षक ऊपजिल्हा रुणालय वसमत यांच्या सुभ हास्ते हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली.

यावेळी डॉ सुनील देशमुख सहाय्यक संचालक कुष्ठरोग हिंगोली यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व कुष्ठरोगा विषयी माहीती सांगून सर्व सरकारी रुग्णालयात कुष्ठरोग विषयी औषधोपचार ऊपलब्ध असल्याचे सांगितले.

यावेळी डॉ संदिप काळे तालुका आरोग्य अधिकारी वसमत, डॉ. कऱ्हाळे, डॉ शिवशंकर कापसे, श्री अमोल पटवे, श्री शिवराज कदम, श्री रमेश मानवत प्राचार्य इंदिरा गांधी नर्सिंग स्कूल वसमत, प्राध्यापक नागनाथ गजमल, श्री सुनील बांगर व मोठ्या संख्येने आरोग्य कर्मचारीवर्ग हजर होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री एम.जी.पवार अवैप यांनी केले.

स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेले विद्यार्थी दिपक पांडुरंग खरात, आशिष दत्तराव जावळे, ज्ञानेश्वर गजानन घोगरे, महिला गटात सविता सखाराम हिवाळे, स्वाती सखाराम हिवाळे, विमल प्रल्हादराव बागल यांनी यश संपादन केले.



**हिंगोली- येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांचेहस्ते करण्यात आले. त्यानंतर जिल्ह्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक माणिकराव टाकळगव्हाणकर आणि ज्येष्ठ समाजसेवक मधुकर मांजरमकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी दिलीप चव्हाण, ॲड सतीश देशमुख, ॲड सुनीता देशमुख, सौरभ चव्हाण आदींची उपस्थिती होती. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### सर्व पक्षीयांच्यावतीने शोकसभेचे आयोजन




हिंगोली- येथे शिवाजीराव सभागृह येथे पीपल्स रिपब्लिकन पार्टी आणि सर्व पक्ष, सर्व संघटना, व सर्व सामाजिक कार्यकर्ते हिंगोली जिल्ह्याचे वतीने शोकसभाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी स्व. विजयरावजी वाकोडे , स्व. सोमनाथ सुर्यवंशी, स्व. पडघन यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी सर्व समाजातील व पक्षातील नेते सर्व संघटनाचे पदाधिकारी व जिल्हाभरातील सामाजिक कार्यकर्ते अशोक सभेत उपस्थित होते यावेळी दिवाकर रावजी माने, पत्रकार प्रकाश इंगोले, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी नगराध्यक्ष जगजीतराज खुराना, श्री सुरेश अप्पा सराफ, मिलिंद उबाळे तसेच अनेक पक्षातील नेते, संघटनेचे अध्यक्ष, सामाजिक चळवळीतील अनेक कार्यकर्ते या शोकसभेला उपस्थित होते.

# औंढा नागनाथ येथे महाशिवरात्री यात्रेस सुरूवात, धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी, नागनाथ मंदिरावर भगवे पताका तोरण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**



औंढा नागनाथ येथे महाशिवरात्री आज पासून यात्रेस सुरुवात झाली आहे. नागनाथ मंदिरातील मुख्य मंदिरावर भगवे पताकेची तोरणे लावण्यात आली आहेत. तसेच नागनाथ मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजता ह भ प बाळू महाराज गिरगावकर यांचे नागनाथ मंदिरातील संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या मंदिराशेजारील सभा मंडपात कीर्तन होणार आहे.

२४ फेब्रुवारीपासूनच महाशिवरात्र यात्रेस सुरुवात होणार आहे. नागनाथ मंदिर परिसराची रंगरंगोटी, मंदिर गेट व मुख्य मंदिरावर विद्युत रोषणाई टाकण्यात आली आहे.सोमवारपासून फेब्रुवारी (ता.२४) यात्रा महोत्सवाला सुरवात असून शनीवारपर्यंत मार्च (ता.१) चालणार आहे.

महाशिवरात्रीच्या दिवशी बुधवार (ता.२६) फेब्रुवारीला श्री नागनाथाची पालखी सोहळा रात्री ०७ वाजता होईल. शनिवारी (ता.१) मार्चला रात्री १० वाजता रथोत्सव आणि दुपारी दोन वाजता रथोत्सवानिमित्ताने महाप्रसाद वाटप केल्या जाणार आहे. विजया एकादशीचे कीर्तन रवीवारी (ता.२) मार्चला सकाळी ०९ ते ११ या वेळेत नामदेव महाराज ढवळे चारठाणकर यांचे काल्याचे कीर्तन व त्यानंतर महाशिवरात्र उत्सवाची सांगता होणार आहे. या सर्व कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन नागनाथ देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. नागनाथ देवस्थानचे सल्लागार तथा आमदार संतोष बांगर, नागनाथ देवस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे,नागनाथ देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, गार्डप्रमुख बबन सोनुने, कृष्णा पाटील, नागेश माने, रामप्रसाद उदगिरे, गणेश उदगिरे यांच्यासह नागनाथ देवस्थानचे सर्व कर्मचारी यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. महाशिवरात्र यात्रेत आकाश पाळणे मोठा झुला, फुटाणे मुरमुऱ्याचे दुकाने, लहान मुलांसाठी वेगवेगळ्या खेळण्याची दुकाने आली आहे तर मंदिराच्या बाजूलाच मोठा आकाश पाळणा व शेलुंबो झुला तयार करण्याचे काम सुरू आहे. महाशिवरात्र यात्रेला सुरुवात झाली असून छोटे-मोठे व्यापारी यात्रेमध्ये आली आहेत. राज्य, परराज्यातून लाखोंच्या संख्येने श्रीक्षेत्र औंढा नागनाथ येथे भाविक दाखल होतात. तसेच दिंड्या, पालख्या येणार. महाशिवरात्र यात्रा उत्सव भव्य स्वरूपात साजरा होणार आहे. त्यासाठी नागनाथ देवस्थानने तयारी केलेली आहे.सीसीटीव्ही कार्यान्वित पोलिस प्रशासनाकडून सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तयारीचा आढावा घेण्यात येत आहे. त्यांच्याबरोबर मंदिर व मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहेत. प्रत्येक हालचालीवर पोलिस प्रशासनाचे लक्ष राहणार आहे. नागनाथ देवस्थान कडून ३०० स्वयंसेवक, यात्रेनिमित्ताने सर्व समित्या स्थापन, अग्निशामन एक, ॲम्बुलन्स एक, लाईट गेल्यानंतर जनरेटरची व्यवस्था ,भाविकांना पिण्यासाठी आरओचे शुद्ध पाणी, आरोग्य विभाग, मंदिर परिसरामध्ये विद्युत रोषणाई ,महाशिवरात्रयात्रे निमित्ताने पोम्प्लेटद्वारे प्रसिद्धी, भाविकांना यात्रेत येण्यासाठी महामंडळाकडून बसची व्यवस्था, भक्तनिवास भक्तांसाठी सज्ज करण्यात आले. नागनाथ मंदिर परिसरात २८ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. पोलीस प्रशासनाकडून महाशिवरात्र यात्रेमध्ये तगडा पोलीस बंदोबस्त राहणार आहे, अशी माहिती देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार यांनी दिली आहे.

# राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचा दौरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांचा दि २५ फेब्रुवारी रोजी हिंगोली दौरा आहे.

या दौऱ्यानिमित्त नांदेडहून नर्सी नामदेव येथे सकाळी ११ वाजता संत नामदेव महाराजांच्या समाधीचे दर्शन घेणार आहेत. त्यानंतर हिंगोली येथे दुपारी बाराव वाजता ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक माणिकराव टाकळगव्हाणकर यांच्या शताब्दीवर्षानिमित्त त्यांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे तसेच राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांच्या हॉटेल शांतीचे उद्घाटन शरदचंद्र पवार यांच्याहस्ते होणार आहे. त्यानंतर २ ते २.४५ पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. यानिमित्त राष्ट्रवादीच्यावतीने कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली असून या कार्यक्रमासा उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यख दिलीप चव्हाण यांनी केले आहे.

# योध्दा शंभूराजे मित्र मंडळातर्फे जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहीत्याचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ फेब्रुवारी**

योद्धा शंभूराजे मित्र मंडळाने शिवजयंती निमित्त कौतुकास्पद उपक्रम राबविला. लोहगाव येथील जिल्हा परिषद शाळा ही उपक्रमशील शाळा म्हणून प्रसिद्ध आहे. येथील सर्व शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी योद्धा शंभूराजे मित्र मंडळाने यावर्षी शिवजयंती निमित्त शाळेतील सर्व ३८३ विद्यार्थ्यांना, जवळपास १५ हजार रु.चे विविध शैक्षणिक साहित्य वाटप केले. यामध्ये स्केच पेन, विविध साहित्याची कीट, कंपास पेटी व परीक्षेचे पॅड यांचा समावेश आहे.

सर्वप्रथम शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी शाळेतर्फे मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात ॲड. विलास नवघरे यांनी शाळेचे व विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. योद्धा शंभूराजे मित्र मंडळाचे महेश अंभोरे, विकास मस्के, डॉ. भैरव नवघरे, ज्ञानेश्वर सावळे, ॲड. नवनाथ पारोकर, ॲड.विलास नवघरे, प्रतीक परतानी, अंकुश मस्के, अविनाश फुटाणे, गोपाल सावळे, दत्तराव कदम, तसेच ज्ञानेश्वर रिठे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप धामणे यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक तनपुरे सरांनी केले. आर डी कऱ्हाळे उपक्रमाचे कौतुक करून अशीच मदत शाळेला व्हावी ही अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक वृंद तनपुरे एल जी, अंभोरे एस ए, आर डी कऱ्हाळे, धामणे डी एस, इंगोले आर जी, येडे यू आर, सूर्यवंशी ताई, वाढोणकर ताई यांनी परिश्रम घेतले.

